0001

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-** १) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दिनांक १२/०२/२०१३ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१०/२०१३/जा.१३२, दिनांक १४/०२/२०१३ व ०१/०३/२०१३.

३) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, आर.सी.एफ. पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक १४/०२/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

४) मे.कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि, टँकर क्र.एमएच ०४ इएल ८७३३ चे मालक श्रीकांत धोंडीराम कटके, ट्रक क्र. एमएच ४३ यू ४५५६ चे मालक तथा मे. एमसन गॅस डिस्ट्रिब्युटरचे भागीदार सैफ अब्दुल मजीद मोजावाला व ट्रक क्र.एमएच ०४ एफ जे २०८८ चे मालक तथा मे. आनंद गॅस सर्व्हिसचे भागीदार विनोद राजेंद्र सिंग यांचे दि.२७/०२/२०१३ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

५) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, आर.सी.एफ. पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक २८/०२/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

६) या कार्यालयाची "अंतरीम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१०/२०१३/जा.१७२, दिनांक ०४/०३/२०१३.

७) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, आर.सी.एफ. पोलिस ठाणे, मुंबई यांचे दि.१२/०३/२०१३ रोजीचे अभिवेदन.

८) मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. चे प्रशासकिय व्यवस्थापक भरत ठक्कर व मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. चे प्लॉट ऑफिसर धनेश शरद संपत यांचे दिनांक १२/०३/२०१३ रोजी प्राप्त संयुक्त लेखी निवेदन.

९) ट्रक क्र. एमएच ०४ एफ जे २०८८ चे चालक विजयकुमार जवाहरलाल कनोजिया, ट्रक क्र. एमएच ४३ यू ४५५६ चे चालक बिरेंद्र कुमार कनोजिया, टँकर क्र. एमएच ०६ अेक्यू ५४०२ चे चालक संजय गंगा यादव यांचे दिनांक १२/०३/२०१३ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

१०) टँकर क्र. एमएच ०४ इएल ८७३३ चे मालक श्रीकांत धोंडीराम कटके याचे दिनांक १३/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

११) टँकर क्र. एमएच ०६ अेक्यू ५४०२ चे मालक गुरुप्रित सिंग सैनी यांचे दिनांक १५/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

१२) ट्रक क्रमांक एमएच ४३ यू ४५५६ चे मालक तथा मे. एमसन गॅस डिस्ट्रिब्युटरचे भागीदार व ट्रक क्र. एमएच ०४ एफ जे २०८८ चे मालक तथा मे. आनंद गॅस सर्व्हिसचे भागीदार विनोद राजेंद्र सिंग यांचे दिनांक २१/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त स्वतंत्र निवेदने.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१०/२०१३/जा.३८४
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज. टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : २५/०४/२०१३.

# आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक ०५/०२/२०१३ रोजी मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम लि. या कंपनीमध्ये बीपीसीएल कंपनीकडून प्राप्त झालेल्या बल्क एलपीजी साठयामधून कमी प्रमाणात सिलेंडर्स भरुन शिल्लक राहिलेल्या साठयातून कंपनीच्या ताब्यात असलेल्या सिलेंडर्समध्ये अनधिकृतरित्या गॅसचा साठा भरुन तो बेमालूमपणे अवैधरित्या व गैरमार्गाने विक्री करीत असल्याबाबत या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार या कार्यालयाच्या अधिपत्याखालील उपनियंत्रक शिधावाटप व फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह सायंकाळी ०४:०० वाजता मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम लि., जिजामाता नगर, माहूल, चेंबूर, मुंबई येथील गेट वर पोहचून गेटवरील सुरक्षा रक्षकास पथकाची ओळख करुन देऊन, येण्याचे प्रयोजन सांगितले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी कंपनीच्या आतमध्ये प्रवेश केला. कंपनीच्या आवारात प्रवेश करताच उजव्या हातास असलेल्या कार्यालयात उपस्थित व्यक्तीस त्याचे नांव गांव विचारले असता, त्यांनी त्यांचे नांव भरत ठक्कर असे सांगून ते सदर मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम या कंपनीमध्ये ॲडमिनिट्रेशन मॅनेजर म्हणून काम करत असल्याचे सांगितले. त्यांना येण्याचे प्रयोजन सांगून त्यास सहकार्य करण्याची विनंती केली असता, ती त्यांनी मान्य केली.

तदनंतर अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष भरत ठक्कर यांचेकडे चौकशी केली असता, त्यांनी सांगितले की, मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडीया लि. या कंपनीचा बी.पी.सी.एल कंपनीचे गॅस सिलेंडर भरुन देणेबाबत करार झालेला आहे. त्यानंतर अधिकाऱ्यांनी त्यांच्या अपॉइंटमेंट लेटरबाबत त्याचेकडे विचारणा केली असता, तसे अपॉइंटमेंट लेटर त्यांना कंपनीने दिले नसल्याचे सांगितले. बी.पी.सी.एल कंपनीने त्यांच्या कंपनीस लेटर ऑफ इन्डेंट दिलेले आहे. भारत पेट्रोलियम कंपनी समवेत सिलेंडर्स रिफिलींग करीता करारबध्द आहे. भारत पेट्रोलियम कंपनीकडून बल्क गॅस भरुन त्यांच्या कंपनीत आणले असता, ते अनलोड करुन बॉटलिंग प्लँटसाठी वापरण्यात येतात. भरलेले गॅस सिलेंडर कंपनीने दिलेल्या आदेशानुसार एजन्सीच्या ट्रकमध्ये गॅस सिलेंडर लोडींग करुन पाठविले जातात. परंतु त्याबाबत कंपनीकडून तसे लेखी ऑर्डर दिली जात नाही. त्यामूळे जो ट्रक रिकामे सिलेंडर घेऊन येईल त्यांना रिकामे सिलेंडर खाली करुन भरलेले सिलेंडर लोड करुन दिले जातात. अधिकाऱ्यांनी सद्यस्थितीत कंपनीच्या परिसरात उभे असलेले ट्रकची संख्या, सदरचे ट्रक हे कोठून आले व कोणत्या गॅस वितरकाशी सबंधित तसेच कंपनीच्या फिलींगचे व उभे असलेले ट्रक यामध्ये एकूण घरगूती व व्यवसायिक वापराचे रिकामे व भरलेले या सर्व बाबीचे तपशीलवार माहिती

कंपनीचे प्रशासकीय प्रमुख म्हणून त्यांचेकडे विचारणा केली असता, सदरची माहिती त्यांचेकडे उपलब्ध नसल्याचे अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सांगितले. तसेच रिकामे सिलेंडर रिफिलींग करिता नेमणूक केलेल्या गॅस वितरकांची यादी अथवा वितरकांना बीपीसीएल कंपनीकडून प्राधिकृत केलेल्या पत्राची प्रतही त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे सांगितले. प्रशासकीय कामकाजासाठी त्यांना मदतनीस म्हणून त्यांच्या अधिपत्याखालील श्री प्रशांत बेडे हे सकाळच्या सत्रात सकाळी ७.०० ते ३.०० तसेच दुपारच्या सत्रात दुपारी ३.०० ते रात्री ११.०० वाजेपर्यंत या वेळेत काम करीत असतात. त्याला सिलेंडर रिफिलींगबाबतच्या तांत्रिक शिक्षण नसतानाही तो सदर रिफिलींग प्लांटचे संपूर्ण व्यवस्थापन करीत असल्याचे अधिकायांना पंचासमक्ष सांगितले. त्याबाबत भरत प्रेमचंद ठक्कर यांचा लेखी जबाब अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष नोंदविला.

त्यानंतर कार्यालयातील दुसरे उपस्थित व्यक्ती धनेश शरद संपत, यांचेकडे अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष चौकशी केली असता, ते सदर कंपनीमध्ये मागील तीन वर्षापासून प्लांट ऑफिसर या पदावर नोकरी करत असल्याचे सांगितले. त्यांचे अधिपत्याखाली सुमारे चाळीस कामगार काम करीत असून सदर प्लांटमध्ये रिकामे, घरगुती व व्यवसायिक वापराचे सिलेंडर घेऊन येणाऱ्या ट्रकमधून कामगारांचे सहाय्याने रिफीलिंग प्लॅटमध्ये उतरविले नंतर सदर सिलेंडरमध्ये एलपीजी गॅस भरुन ट्रक रवाना करणे, दिवसभरातील आलेले ट्रक व भरणा केलेले सिलेंडर तसेच बी पी सी एल कंपनीमधून पाठविण्यात आलेले कॅप्सूल टँकरमधून एलपीजी गॅसचा साठा त्यानुसार सिलेंडर भरण्यासाठी वापरण्यात आलेला साठा या सर्व महत्वाच्या बाबींचा लेखाजोखा ठेवणे हे त्याचे कार्यकर्तव्य आहे असे अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सांगितले. अधिकाऱ्यांना प्लांटच्या परिसरात तपासणी करावायाची असल्यामूळे त्यांनी त्यांच्यासमवेत प्लांटमधील संपूर्ण कार्यपध्दतीची माहिती दिली. प्लांटमध्ये सद्यस्थितीत शेडमधील सिलेंडर, ट्रकमधील सिलेंडर बुलेट टँकमधील साठयाची अधिकाऱ्यांनी प्लांट ऑफिसर धनेश संपत व पंचासमक्ष मोजदाद केली असता, एकूण वीस ट्रक कंपनीच्या परिसारात उभे असल्याचे आढळून आले. त्याचा तपशील खालीलप्रमाणे,

| अ.क्र. | ट्रक क्रमांक | भरलेले सिलेंडर्स | | रिकामे सिलेंडर्स | |
|---|---|---|---|---|---|
| | | घरगूती | व्यवसायिक | घरगूती | व्यवसायिक |
| १ | एमएच ०४ ईवाय ९५८५ | ० | ० | २५२ | ३६ |
| २ | एमएच ०६ अेसी १४८७ | ० | ० | ३०० | ० |
| ३ | एम एच ०४ डीडी १२८३ | ० | ० | ३०० | ० |
| ४ | एमएच ०६ अेक्यू ४९४९ | ० | ० | ३०० | ० |
| ५ | एमएच ४३ यु ४५५६ | ० | ० | २०४ | ७२ |
| ६ | एमएच १९ झेड ८१२६ | ० | ० | ३०० | ० |
| ७ | एमएच ०६ अेक्यू ४८९९ | ० | ० | २०४ | ७२ |
| ८ | एमएच ०४ एफएस ८४१८ | ० | ० | २०४ | ७२ |
| ९ | एमएच ०४ एफयु ५४७६ | ० | ० | ३०० | ० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | एमएच ०४ सीपी २३०५ | ० | ० | ३०० | ० |
| ११ | एमएच ०४ डीडी २८८० | ० | ० | २५२ | ३६ |
| १२ | एमएच ०४ एफ़जे ७६३९ | ० | ० | २५२ | ३६ |
| १३ | एमएच ०४ ईवाय ७०८८ | ० | ० | ३०० | ० |
| १४ | एमएच ०४ डीडी ४६५७ | ० | ० | ० | २३४ |
| १५ | एमएच ०४ एफजे २१९५ | ० | ० | २०४ | ७२ |
| १६ | एमएच ०४ एफपी ४८०९ | ० | ० | ७८ | ० |
| १७ | एमएच ०४ एफजे २४५६ | ० | ० | ३०० | ० |
| १८ | एमएच ०४ एफ़जे २७७८ | ० | ० | ३०० | ० |
| १९ | एमएच ०४ एफजे ८३४३ | ० | ० | २०४ | ७२ |
| २० | एमएच ०४ एफजे २०८८ | २५२ | ३६ | ० | ० |
| एकूण | | २५२ | ३६ | ४५५४ | ७०२ |

वरीलपैकी एकोणीस ट्रकमध्ये ४५५४ घरगूती वापराचे तसेच ७०२ व्यावसायिक वापराचे रिकामे गॅस सिलेंडर आढळून आले. तसेच ट्रक क्रमांक एमएच ०४ एफ ज़े २०८८ या ट्रकमध्ये २५२ घरगूती वापराचे तसेच व्यवसायिक वापराचे ३६ भरलेले सिलेंडर आढळून आले. सदर ट्रक क्रमांक एमएच ०४ एफ जे २०८८ हा आधिकाऱ्यांनी कंपनीच्या प्रवेशव्दारातून बाहेर जात असतानाच पंचासमक्ष अडविले. कंपनीच्या प्रचलित पध्दतीनुसार सिलेंडर भरलेली गाडी ही गेटच्या बाहेर जाण्या अगोदर शेड जवळील कार्यालयात गॅस वितरकाचे नांवे चलन बनविले जाते व तद्नंतर ट्रक गेटमधून बाहेर सोडण्यात येत असतात. परंतु सदर ट्रकचे चलन तयार झालेले नसताना ते गेटच्या बाहेर विनाचलन जात असल्याचे आढळून आल्याने अधिकाऱ्यांनी सदरचे ट्रक क्र. एमएच ०४ एफ जे २०८८ जागीच जप्त केले.

तद्नंतर अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष कंपनीमध्ये उभे असलेल्या एकूण वीस ट्रकची गेटवरील इनवर्ड/आऊटवर्ड रजिस्टरमध्ये तुलनात्मक पडताळणी केली असता, ट्रक क्रमांक एमएच ४३ यू ४५५६ या ट्रकची नोंद इनवर्ड रजिस्टरमध्ये आढळून आली नाही. ही बाब संशयास्पद वाटली. तद्नंतर आधिकाऱ्यांनी पंचासमक्ष शेडमधील सिलेंडरची मोजदाद केली असता, त्यामध्ये घरगुती वापराचे एकूण २७२ भरलेले सिलेंडर पैकी सिल लावलेले १४७ सिल न लावेलेले ५३ व लिकेज डॅमेज ७२ सिलेंडर आढळून आले. तसेच एकूण ६०० घरगूती वापराचे रिकामे सिलेंडरपैकी ३७४ हॉट रिपेंअर सिलेंडर, १०९ डिपीटी सिलेंडर व इतर ११७ सिलेंडर आढळून आले. व्यवसायिक सिलेंडरमध्ये भरलेले १५ तसेच रिकामे ५२७ सिलेंडर आढळून आले असे मिळून एकूण घरगुती वापराचे ८७२ व व्यवसायिक वापराचे ५४२ सिलेंडर आढळून आले. सदर कंपनीत बीपीसएल कंपनीचे घरगुती व व्यवसायिक वापराचे सिलेंडर भरुन दिली जात असताना प्रत्यक्षात तपासणीच्यावेळी शेडमध्ये व्यवसायिक वापराचे एचपीसीएल कंपनीचे ३६ व इण्डेन (आयओसी) या कंपनीचे ९० सिलेंडर आढळून आल्याने याबाबत अधिकाऱ्यांनी विचारणा

केली असता, ते वितरकाने पाठविलेल्या ट्रकमधून आलें असल्याचे धनेश शरद संपत यांनी सांगितले. तद्नंतर अधिकाऱ्यांनी कंपनीच्या अभिलेखात नोंद नसलेले परंतु प्रत्यक्षात कंपनीच्या परिसरात उभा असलेला ट्रक क्रमांक एमएच ४३ यू ४५५६ व त्यामधील घरगुती वापराचे २०४ व व्यवसायीक वापराचे ७२ रिकामे सिलेंडर तसेच शेडमधील एचपीसीएल कंपनीचे ३६ व इण्डेन (आयओसी) या कंपनीचे ९० सिलेंडर हे उपस्थित अधिकाऱ्यांनी समाधानकारक उत्तर न दिल्याने जागीच जप्त केले.

तद्नंतर अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष दिनांक ०१/०२/२०१३ पासून कंपनीतील कामकाजाचा लेखाजोखा सादर करण्यास सूचित केला असता, शेडवरील आवक जावक रजिस्टर, रिकामे घरगूती व व्यवसायिक वापराचे नोंद रजिस्टर, गेट वरील ट्रकचे आवक जावक रजिस्टर इत्यादी दस्तऐवज सादर केले. तद्नंतर अधिकाऱ्यांनी गेटवरील आवक/जावक राजिस्टर त्यांचेसमक्ष तपासून पाहिले असता, दिनांक ०१.०२.२०१३ रोजी ८६४०, दिनांक ०२.०२.२०१३ रोजी ९७८६, दिनांक ०३.०२.२०१३ रोजी ४८८४, दिनांक ०४.०२.२०१३ रोजी ११६६४ व दिनांक ०५.०२.२०१३ रोजी ९००० असे मिळून एकूण ४३९७४ घरगूती वापराचे सिलेंडर भरुन वितरण केल्याचे आढळून आले. तसेच दिनांक ०१.०२.२०१३ रोजी ९८४, दिनांक ०२.०२.२०१३ रोजी १४१६, दिनांक ०३.०२.२०१३ रोजी ९६६, दिनांक ०४.०२.२०१३ रोजी १६८६ व दिनांक ०५.०२.२०१३ रोजी १४६४ असे मिळून एकूण ६५१६ व्यवसायिक वापराच्या सिलेंडरमध्ये गॅस भरुन ट्रकव्दारे वितरण केल्याचे आढळले. सदरच्या वितरणाची आकडेवारी अधिक खातरजमा करण्याकरिता बीपीसीएल कंपनीच्या सॅप (SAP) या अधिकृत सॉफ्टवेअरमधून प्लांटच्या कार्यालयातील संगणकामधून वितरणाची अधिकृत आकडेवारी उपस्थित कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून प्राप्त करुन घेतली व त्यांची गेट रजिस्टरच्या आकडेवारीशी तुलनात्मक पडताळणी केली असता, बीपीसीएल कंपनीच्या अभिलेखानुसार दिनांक ०१.०२.२०१३ ते ०५.०२.२०१३ या कालावधीत घरगूती वापरातील ४१९२० व व्यवसायिक वापराचे ६६९८ सिलेंडर वितरण झाल्याची आकडेवारी आढळून आली. म्हणजेच २०५४ घरगूती व्ापराचे सिलेंडर हे अतिरिक्त भरुन दिल्याचे आढळून आले. तर व्यवसायिक वापराच्या १८२ सिलेंडर हे अधिकृत आकडेवारीपेक्षा कमी भरुन दिल्याचे आढळून आले.

तद्नंतर अधिकाऱ्यांनी कंपनीच्या परिसरात असलेल्या दोन बुलेट टँकमधील एलपीजी साठयाची कंपनीच्या अधिकाऱ्यांसमवेत व पंचांसह मोजदाद केली असता, दोन्ही टाक्यांमध्ये मिळून ७४२९.७३ किलोग्रॅम तसेच कंपनीच्या परिसरात भरुन उभे असलेले ट्रक क्रमांक एमएच ०४ एफ जे २०८८ या ट्रकमधील २५२ घरगूती व ३६ व्यवसायिक वापराचे सिलेंडरमध्ये भरण्याकरिता वापरण्यात आलेला ४२६२.४० किलोग्रॅम असे मिळून एकूण ११६९२.१३ किलोग्रॅम एलपीजी गॅसचा साठा आढळून आला. अधिकाऱ्यांनी मागणी केल्यानुसार सादर केलेल्या अभिलेखामधील एलपीजी स्टॉकची नोंदवही तपासून पाहिली असता, दिनांक ०१.०२.२०१३ रोजी १५६८३.०५

किलोग्रॅम साठा प्राथमिक शिल्लक आढळून आला त्यामधील दिनांक ०१.०२.२०१३ ते ०५.०२.२०१३ या कालावधीत ७३५५०० किलोग्रॅम साठ्याची झालेली आवक जमा करुन एकूण ७५११८३.०५ उपलब्ध साठा असल्याचे आढळून आले. त्या उपलब्ध साठ्यामधून सदर कालावधीमध्ये तेल कंपनीच्या आकडेवारीनुसार ४१९२० घरगूती वापराचे व ६६९८ व्यवसायिक वापराचे सिलेंडर भरण्याकरिता अनुक्रमे ५९५२६४ किलोग्रॅम व १२७२६२ किलोग्रॅम असे मिळून ७२२५२६ किलोग्रॅम गॅसचा साठा वापरण्यात आल्याचे आढळून आले. सदर आकडेवारीनुसार नमूद सिलेंडर भरण्याकरिता वापरण्यात आलेला साठा वजा करता पुस्तकी शिल्लक म्हणून २८६५७.०५ किलोग्रॅम एलपीजीचा बल्क साठा शिल्लक असणे आवश्यक असताना प्रत्यक्षात मोजदाद मध्ये ११६९२.१३ किलोग्रॅम साठा शिल्लक असल्याचे आढळून आले. म्हणजेच एकूण १६९६४.९२ किलोग्रॅम एलपीजी साठा हा पुस्तकी शिल्लक पेक्षा कमी आढळून आला. याबाबत अधिकाऱ्यांनी अधिक विचारणा केली असता, त्यांच्याकडे उपलब्ध असलेला अभिलेख त्यांनी सादर केल्याचे सांगितले.

सदरच्या तपासणीमध्ये मे. बी.पी.सी.एल या कंपनीचे वतीने तपासणी कामी सहकार्य करण्यासाठी श्री अशिष पळेकर व श्री एल एस कोळंबकर हे अधिकारी उपस्थित होते. तसेच वैधमापन शास्त्र विभाग, या चेंबूर विभागाचे पथक या तपासणीकामी उपस्थित राहून त्यांनी कंपनीमध्ये उभे असलेले ट्रक क्रमांक एमएच ०४ एफजे २०८८ या ट्रकमधील भरलेल्या घरगूती व व्यवसायिक वापराचे अनुक्रमे २५२ व ३६ सिलेंडर कामगारांच्या सहाय्याने ट्रकमधून शेडमध्ये उतरवून घेतले व सदर सिलेंडरचे पुन्हा वजन करुन फेरतपासणी केली असता, त्या सिलेंडरमधील गॅस साठ्याचे निव्वळ वजन तपासणीत कमी आढळल्यामूळे वैधमापनशास्त्र अधिनियम २००९ अंतर्गत कारवाई करुन सदर सिलेंडर जप्त करुन मे. कॉन्फीडन्स पेट्रोलिस इंडिया लि. या कंपनीविरुध्द खटला नोंदविण्यात आला आहे. तद्नंतर अधिकाऱ्यांनी कंपनीतील ट्रक व शेडमधील प्रत्यक्षात मोजदाद केलेल्या सिलेंडरच्या साठयाची कंपनीच्या बुक स्टॉकप्रमाणे तुलनात्मक पडताळणी केली असता, ट्रक क्रमांक एमएच ४३ यु ४५५६ या ट्रकमधील सिलेंडरचा साठा घरगुती वापराचे २०४, व्यावसायिक वापराचे ७२ सिलेंडर हे अतिरिक्त आढळून आले. तसेच शेडमधील सिलेंडरची तुलनात्मक पडताळणी केली असता, घरगुती वापराचे ९ सिलेंडर अतिरिक्त तर व्यावसायिक वापराचे १ सिलेंडर कमी आढळून आले.

शेडमधील आढळून आलेले घरगुती वापराचे ८७२ व व्यावसायिक वापराचे ५४२ सिलेंडर असे मिळून एकूण १४१४ सिलेंडरबाबत अधिकाऱ्यांनी विचारणा केली असता, सदर सिलेंडरचा साठा हा कोणत्याही गॅस वितरकाशी संबंधित नसून तो त्यांच्या कंपनीचा ताब्यात असलेला साठा असून त्याबाबत पुरावादर्शक कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सांगितले असल्याने अधिकाऱ्यांनी सदर १४१४ सिलेंडरचा साठा जागीच जप्त केला आहे व तसा धनेश शरद संपत यांचा लेखी जबाब पंचासमक्ष नोंदविण्यात आला.

irrespective of the tank truck capacity. 'Prevailing rate' means the rate prevailing on the date of dispatch of the cargo from the loading base/nearest loading base, inclusive of all taxes." असा कंपनी बरोबर स्पष्ट करार असुन त्यानुसार त्यांनी कोणताही गुन्हा केलेला दिसून येत नाही. सदर टँकर क्र. एमएच ०४ इएल ८७३३ हा भारत पेट्रोलियम कॉर्पो. लि. मधून भरुन निघाल्यापासून ते आपण जप्त करेपर्यंत टँकरचे गॅस भरल्यानंतरचे कॅपनीचे सिल जसेच्या तसे आहे. तसेच भारत पेट्रोलियम कॉर्पो. लि. व मे. कॉन्फिडन्स पेट्रोलियम यामधील अंतर सुमारे २ कि.मी. चे आतील असून तेथे वेळेवर नियोजित ठिकाणी नेहमीच्या मार्गाने गेलेला आहे. सदर नमूद टँकर क्र. एमएच ०४ इएल ८७३३ चे मोजमाप करताना आपल्या अधिकाऱ्यांनी फक्त इंजिन सहित टँकरचे वजन ज्यास ग्रॉस वेट म्हणतात ते केले आहे. प्रत्यक्षात त्यातील निव्वळ BULK LPG चे मोजमाप केलेले नाही. त्यामुळ गॅसची घट ही सिध्द होत नाही. आपल्या अधिकाऱ्यांनी फक्त चलनावर नमूद गॅस गृहीत धरला प्रत्यक्ष BULK LPG गॅसचे मोजमाप केलेले नाही. कारण सिल तसेच आहे व त्यातील टँकरमध्ये BULK LPG जसेच्या तसे आहे. त्यामुळे ती घट गॅसचीच आहे हे सिध्द झालेले नाही. तसेच असाही खुलासा करतो की, नमूद टँकर वरील चालक भानुप्रताप मौर्य हा अमराठी हिंदी भाषीक असून त्यास मराठी व इंग्रजी समजत नाही. आपल्या अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतलेली टँकरची चावी व परमीट चलन सहीत देतो असे सांगून त्याची दिशाभूल करुन स्वाक्षरी घेण्यात आली आहे. नमूद केलेल्या वस्तुस्थितीवरुन त्याने कोणताही गुन्हा केलेला नाही. तसेच जीवनावश्यक वस्तू कायद्याचा भंग केलेला नाही हे नम्रपणे नमूद करतो. तो एक इमाने इतबारे काम करणारा सुशिक्षित वहातुकदार असून कृपया त्याच्या खुलाशाचा सहानुभूतीपूर्वी विचार करुन त्याला व त्याच्या चालकास/क्लिनर निर्दोष मुक्त करुन त्याचा टँकर त्याला मुद्देमालासह परत करावा, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २७/०२/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. यांचे वतीने ॲड. श्री. विनोद तिवारी यांनी कंपनीच्या सादर केलेल्या निवेदनात, त्यांची कंपनी नोंदणीकृत असलेले पब्लिक लिमिटेड कंपनी असून त्याचे मुख्यालय नागपूर येथे आहे. कंपनीच्या वतीने मे. बी.पी.सी.एल. या कंपनीचे घरगुती व व्यवसायीक वापराचे सिलेंडर भरुन दिले जातात व चेंबूर येथील बॉटलिंग प्लॉटकरीता ते संबंधित तेल कंपनीसोबत करारबध्द आहेत. सदर प्रकरणी, त्यांची कंपनी डिलर अथवा वितरक नसून बॉटलिंग प्लॉटमध्ये त्यांच्या कामाचा स्वरुप हा सर्व्हिस उपलब्ध करुन देण्याचा असून मार्केटिंग, विक्री अथवा वितरणाच्या प्रक्रियेमध्ये ते समाविष्ठ नसून सदरची प्रक्रिया मे. बी.पी.सी.एल. या कंपनीने नेमलेल्या वितरकामार्फत करण्यात येते. सदर साठ्याची मार्केटिंग, विक्री व वितरण वितरकांमार्फत होत असल्याने तसेच तो अनुदानित असल्याने त्यास लिक्विफाईट पेट्रोलियम गॅस ऑर्डर, २००० व जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ लागू होत आहे. परंतू सदरचे

दरम्यान अधिकाऱ्यांनी आरसीएफ पोलीस ठाणे येथे भ्रमणध्वनीव्दारे संपर्क साधून तेथे सदर कारवाईची माहिती देण्यात आली व पोलिसांना घटनास्थळी पाठवावे अशी सूचना करण्यात आली. त्याप्रमाणे थोडयाच वेळात आरसीएफ पोलीस ठाणे येथील पोलीस पथक घटनास्थळी उपस्थित झाले.

कंपनीच्या गेटच्या बाहेरील बाजूस अधिकाऱ्यांना एकूण सहा कॅप्सूल टँकर उभे असल्याचे दिसून आले. त्याअनुषंगाने अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष धनेश शरद संपत यांचेकडे विचारणा केली असता, सदरचे सहा टँकरमध्ये एलपीजी गॅसचा साठा भरलेला असून त्याची आवक मे. बीपीसीएल या तेल कंपनीच्या रिफायनरीमधून झाली आहे. सद्यस्थितीत कंपनीत आवश्यकतेनुसार टँकर हे रिकामे करण्यासाठी कंपनीत घेतले जात असताना कंपनीच्या अभिलेखात तसेच गेट एंट्रीमध्ये नोंद केली जात असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी सहा टँकरचे चलनांची मागणी करुन त्याचे अवलोकन केले असता, टँकर क्रमांक एमएच ०६ अेक्यू ५४०२, एमएच ०४ सीपी ६९८१, एमएच ०४ इएल ८७३३ व एमएच ०४ इएल ६०९७ हे चार टँकर दिनांक ०४.०२.२०१३ रोजी भरल्याचे आढळून आले. तसेच टँकर क्रमांक एमएच ४३ ई ६०५० व टँकर क्रमांक ओ आर १५ पी ६१५८ हे दिनांक ०५.०२.२०१३ रोजी भरल्याचे आढळून आले. सदर सहा टँकरपैकी चार टँकर हे दिनांक ०४.०२.२०१३ रोजी भरुन कंपनीत दिनांक ०५.०२.२०१३ रोजी आले असल्याची बाब साशंकता निर्माण करणारी आहे असे अधिकाऱ्यांना पंचासमक्ष आढळून आले. सदर टँकरमधील साठयाची पुर्नमोजदाद करुन खातरजमा करण्याकरिता उपस्थित कंपनीचे अधिकाऱ्यांस सहाही टँकर कंपनीत असलेल्या वजनकाटयावर आणण्याच्या सूचना दिल्या व पुर्नमोजदाद केल्यानंतर टँकरमधील आढळून आलेल्या साठयाचे तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र | टँकर क्रमांक | चलनावरील ग्रॉस वेट | तपासणीतील ग्रॉस वेट | फरक |
|---|---|---|---|---|
| १ | एमएच ०६ अेक्यू ५४०२ | ३३२२० | ३३१५० | - ७० |
| २ | एमएच ०४ सीपी ६९८१ | ३४४४० | ३४४०० | - ४० |
| ३ | एमएच ०४ इएल ८७३३ | ३३९५० | ३३९०० | - ५० |
| ४ | एमएच ०४ इएल ६०९७ | ३२६९० | ३२६५० | - ४० |
| ५ | एमएच ४३ ई ६०५० | ३४९५० | ३४९५० | -- |
| ६ | ओ आर १५ पी ६१५८ | ३४३६० | ३४३५० | - १० |

उपरोक्त आढळून आलेला फरक हा साशंकता निर्माण करणारा असून सदर बाबत बीपीसीएलचे उपस्थित अधिकारी यांना टँकरमधील आढळून आलेल्या गॅस साठ्याच्या घटीबाबत विचारणा केली असता, त्यांनी ४० किलो पर्यंत घट/वाढ अनुज्ञेय असल्याचे सांगितले. वरील टँकरपैकी टँकर क्र. एमएच ०६ अेक्यू ५४०२ व एमएच ०४ इएल ८७३३ या दोन्ही टँकरमध्ये अनुक्रमे ७० व ५० किलो आढळून आलेली घट ही साशंकता निर्माण करणारी व अनुज्ञेय मर्यादेच्या वर असल्याने टँकर क्रमांक एमएच ०६ अेक्यू ५४०२ चे चालक संजयकुमार श्रीगंगाप्रसाद यादव

व एमएच ०४ इएल ८७३३ चे चालक भानूप्रताप मौर्या यांचा लेखी जबाब नोंदविण्यात येऊन दोन्ही टँकरमधील गॅसचा साठा हा चालकाने त्यांच्या स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी अवैधरित्या काढून गैरमार्गाने विक्री केल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्याने अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष दोन्ही टँकर त्यामधील गॅसच्या साठयासह जागीच जप्त केले.

सदर धाडीत जप्त करण्यात आलेला मुद्देमाल खालीलप्रमाणे,

| अ. क्र. | तपशिल | संख्या | वजन (कि.ग्रॅ.) | जप्त मुद्देमालाची बाजारभावाप्रमाणे किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | ट्रक क्रमांक एमएच ०४ एफ जे २०८८ | १ | - | १०,००,०००/- |
| २ | उक्त ट्रकमधील घरगूती वापराचे भरलेले सिलेंडर | २५२ | १४.२ | २,४१,४१६/- |
| ३ | उक्त घरगूती वापराचे रिकामे सिलेंडर ची किंमत | २५२ | १४.२ | ५,०४,०००/- |
| ४ | उक्त ट्रकमधील व्यवसायिक वापराचे भरलेले सिलेंडर | ३६ | १९.० | ५८,३२०/- |
| ५ | उक्त व्यवसायिक वापराचे रिकामे सिलेंडरची किंमत | ३६ | १९.० | १,०८,०००/- |
| ६ | ट्रक क्रमांक एमएच ४३ यू ४५५६ | १ | - | १०,००,०००/- |
| ७ | उक्त ट्रकमधील घरगूती वापराचे भरलेले सिलेंडर | २०४ | १४.२ | १,९५,४३२/- |
| ८ | उक्त घरगूती वापराचे रिकामे सिलेंडर ची किंमत | २०४ | १४.२ | ४,०८,०००/- |
| ९ | उक्त ट्रकमधील व्यवसायिक वापराचे भरलेले सिलेंडर | ७२ | १९.० | १,१६,६४०/- |
| १० | उक्त व्यवसायिक वापराचे रिकामे सिलेंडरची किंमत | ७२ | १९.० | २,१६,०००/- |
| ११ | एचपीसीएल कंपनीचे व्यवसायिक रिकामे सिलेंडरची किंमत | ३६ | १९.० | १,०८,०००/- |
| १२ | इण्डेन (आयओसी)कंपनीचे व्यवसायिक रिकामे सिलेंडरची किंमत | ९० | १९.० | २,७०,०००/- |
| १३ | शेड मधील बीपीसीएल कंपनीचे घरगूती वापराचे रिकामे सिलेंडर्स | ८७२ | १४.२ | १७,४४,०००/- |
| १४ | शेड मधील बीपीसीएल कंपनीचे व्यवसायिक वापराचे रिकामे सिलेंडर्स. | ५४२ | १९.० | १६,२६,०००/- |
| १५ | टँकर क्रमांक एमएच ०६ अेक्यू ५४०२ ची किंमत | १ | - | २०,००,०००/- |
| १६ | उक्त टँकरमधील गॅस साठा | -- | १७६४० | ४,७६,२८०/- |
| १७ | टँकर क्रमांक एमएच ०४ इएल ८७३३ ची किंमत | १ | -- | २०,००,०००/- |
| १८ | उक्त टँकरमधील गॅस साठा | -- | १७३४० | ४,६८,१८०/- |
| | एकुण जप्त मुद्देमालाची किंमत | | | १,२५,४०,२६८/- |

उपरोक्त जप्त मुद्देमाल अधिकाऱ्यांनी मे. बीपीसीएलचे उपस्थित अधिकारी व पोलीस पथक तसेच पंचासमक्ष जप्त केला व तो सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून पोलीसांच्या ताब्यात देण्यात आला.

अशाप्रकारे मे. कॉन्फीडंन्स पेट्रोलियम इंडिया लि. चे प्रशासकीय अधिकारी भरत प्रेमचंद ठक्कर व प्लांट ऑफिसर धनेश शरद संपत हे सिलेंडर भरलेला ट्रक हा विनाचलनाचे तसेच कोणतेही अधिकृत कागदपत्राशिवाय

गैरमार्गाने विक्री करण्यासाठी कंपनीच्या बाहेर पाठवित असताना तसेच विनाकागदपत्रांचे व गेट रजिस्टरमध्ये नोंद घेतल्याशिवाय रिकाम्या सिलेंडरचा ट्रक गॅस भरण्याकरिता अनधिकृतरित्या कंपनीत प्रवेश करण्यास अनुमती दिल्याने तसेच सदर तपासणीमध्ये तेल कंपनीच्या अधिकृत आकडेवारी पेक्षा २०५४ घरगुती वापराचे सिलेंडर्स अतिरिक्त भरुन दिल्याने व या व्यतिरिक्त कंपनीच्या आवारात मिळून आलेले एचपीसीएल व आयओसी कंपनीचे सिलेंडर तसेच शेडमधील विनापुरावादर्शक कागदपत्रांची १४१४ सिलेंडरचा बेकायदेशीर साठा हा गैरमार्गाने साठवणूक केल्याचे तसेच ते स्वतःच्या आर्थिक फायद्यापोटी गैरमार्गाने अवेधरित्या विक्री करण्याच्या उद्देशाने सिलेंडरचा साठा बाळगून ठेवल्याचे संकृतदर्शनी आढळून आले आहे. त्यामुळे मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. चे सर्व संचालक व प्रशासकीय अधिकारी भरत प्रेमचंद ठक्कर व प्लांट ऑफिसर धनेश शरद संपत तसेच उपरोक्त कॅप्सुल टँकर क्रमांक एमएच ०४ इएल ८७३३ व टँकर क्रमांक एमएच ०६ अेक्यू ५४०२ चे चालक, क्लिनर आणि मालक तसेच ट्रक क्रमांक एमएच ०४ एफ जे २०८८ व ट्रक क्रमांक एमएच ४३ यू ४५५६ चे चालक, क्लिनर व मालक यांनी शासनाची तसेच पर्यायाने उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द झाल्याने सर्व संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० तसेच दि लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस (रेग्युलेशन ऑफ सप्लाय ॲण्ड डिस्ट्रीब्यूशन) ऑर्डर २००० चा भंग केल्यावरुन आरसीएफ पोलीस ठाणे, चेंबूर येथे वि.स्था.ख.क्र. ०७/२०१३ दिनांक ०६/०२/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक २७/०२/२०१३ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक २७/०२/२०१३ रोजीच्या सुनावणीस टँकर क्र. एमएच ०४ इएल ८७३३ चे मालक श्रीकांत धोंडीराम कटके, मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. यांचे वतीने ॲड. श्री. विनोद तिवारी हे वकालतनाम्यासह, ट्रक क्रमांक एमएच ४३ यू ४५५६ चे मालक तथा मे. एमसन गॅस डिस्ट्रिब्युटरचे भागीदार सैफ अब्दुल मजीद मोजावाला व ट्रक क्रमांक एमएच ०४ एफ जे २०८८ चे मालक तथा मे. आनंद गॅस सर्व्हिसचे भागीदार विनोद राजेंद्र सिंग यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ४ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. तसेच सदर सुनावणीस टँकर क्र. एमएच ०४ इएल ८७३३ चे चालक भानुप्रताप मौर्या, मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. चे प्रशासकिय

व्यवस्थापक भरत ठक्कर व मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. चे प्लॉट ऑफिसर धनेश शरद संपत हे उपस्थित राहिले. परंतू त्यांनी लेखी निवेदने सादर केली नाहीत. सदर सुनावणीस मे. बी.पी.सी.एल. या कंपनीच्या वतीने श्री. पटनाईक हे उपस्थित राहिले असता त्यांना मे. कॉन्फिडन्स पेट्रोलियम या प्लँटमध्ये गॅस सिलेंडर भरुन देण्यासाठी प्राधिकृत केलेल्या गॅस वितरकांची ट्रक क्रमांकाच्या तपशिलासह यादी तसेच दिनांक ०१/०२/२०१३ ते ०५/०२/२०१३ या कालावधीमध्ये वितरकांनी मे. बी.पी.सी.एल. या कंपनीत गॅस सिलेंडर रिफिलिंग करिता भरणा केलेल्या रकमेचे दिनांक व वेळ निहाय तपशिल सादर करण्यास सुचित केले असता, सदरचे तपशिल सद्य:स्थितीत उपलब्ध नसल्याने पुढील सुनावणीत सादर करणार असल्याचे सांगितले.

मे. कॉन्फिडन्स पेट्रोलियम कंपनीच्या वतीने उपस्थित अधिकारी यांना दिनांक ०१/०२/२०१३ ते ०५/०२/२०१३ या कालावधीमध्ये त्यांनी भरणा केलेल्या विविध गॅस वितरकांचे चलन व गॅस वितरकांकडून प्राप्त ई.आर.व्ही. सादर करण्यास सुचित केले असता, सदरचे अभिलेख सादर करण्यासाठी त्यांनी सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. तथापी, सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी हे उपस्थित राहिले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक १२/०३/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक २७/०२/२०१३ रोजी वरिष्ठ पोलिस निरिक्षक, आर.सी.एफ. पोलिस ठाणे यांचे सुनावणीच्या वेळी प्राप्त अभिवेदनात, नमूद गुन्ह्यातील जप्त मुद्देमालापैकी कॅप्सुल गॅस टँकर क्र. एमएच ०४ इएल ८७३३ व एमएच ०६ अेक्यू ५४०२ या टँकरमध्ये एल.पी.जी. गॅस भरलेला असून तो ज्वालाग्राही असल्याने तसेच वाहतूकीस अवजड असल्याने व इतर ठिकाणीही ठेवणे धोकादायक असल्याने त्याचे निर्गतीबाबत तात्काळ आदेश होण्याची विनंती केली आहे.

प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालापैकी दोन कॅप्सुल गॅस टँकर वगळता उर्वरीत मुद्देमाल हा मे. कॉन्फिडन्स पेट्रोलियम इंडिया लि. या कंपनीच्या आतील परिसरात सुरक्षित ठिकाणी जतन करुन ठेवण्यात आले आहे. तथापी, कॅप्सुल गॅस टँकर क्र. एमएच ०४ इएल ८७३३ व एमएच ०६ अेक्यू ५४०२ हे मे. कॉन्फिडन्स पेट्रोलियम इंडिया लि. या कंपनीच्या बाहेर गेटजवळ उघड्यावर पार्किंग केले असल्याने त्याठिकाणी कंपनीमध्ये प्रवेश करणाऱ्या इतर कॅप्सुल टँकरच्या वाहतूकीमध्ये अडसर निर्माण होत आहे. तसेच दोन्ही कॅप्सुल टँकरमधील एल.पी.जी. गॅसचा साठा हा अतिज्वलनशिल असून तो असा उघड्यावर ठेवणे सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक असल्याची या कार्यालयाची धारणा आहे. प्रस्तूत प्रकरणी सुनावणी होऊन सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकुण घेवून अंतिम निकालपत्र देण्यास विलंब लागणार आहे. सबब, जप्त दोन्ही कॅप्सुल टँकरमधील एल.पी.जी.

CONTROLLER OF R...

गॅसचा साठा हा ज्वलनशील असून, कोणतीही दुर्घटना होवू नये, याकरीता जप्त मुद्देमालाबाबत या कार्यालयाचे वाचावे क्र. ६ अन्वये अंतरीम आदेश पारीत करण्यात आले.

दिनांक १२/०३/२०१३ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. व्ही.एम. हातिसकर यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ७ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. यांचे वतीने अॅड. श्री. विनोद तिवारी यांनी उपस्थित राहून इन्व्हाईस, इ.आर.व्ही. व चलनाच्या छायांकित प्रती सादर केल्या. मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. चे प्रशासकिय व्यवस्थापक भरत ठक्कर व मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. चे प्लॉट ऑफिसर धनेश शरद संपत यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ८ अन्वये संयुक्त लेखी निवेदन सादर केले. ट्रक क्र. एमएच ०४ एफ जे २०८८ चे चालक विजयकुमार जवाहरलाल कनोजिया, ट्रक क्र. एमएच ४३ यू ४५५६ चे चालक बिरेंद्र कुमार कनोजिया व टॅंकर क्र. एमएच ०६ अेक्यू ५४०२ चे चालक संजय गंगा यादव यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ९ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. तसेच सदर सुनावणीस मे. बी.पी.सी.एल. कंपनीचे विक्री अधिकारी श्री. पटनाईक यांनी उपस्थित राहून कंपनीकडून मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. कंपनीने प्राधिकृत केलेल्या वितरकांची यादी तसेच दिनांक ०१/०२/२०१३ ते ०५/०२/२०१३ या कालावधीत वितरकांची नमुद कंपनीतून भरुन घेतलेल्या सिलेंडर्सचे तपशिल सादर केले. सदर अहवालाचे मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. यांनी सादर केलेल्या चलन व इ.आर.व्ही. यांच्याशी तुलनात्मक पडताळणी केली असता, त्यामध्ये साम्यता दिसून आली नाही. याबाबत मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. चे अधिकारी यांनी समाधानकारक उत्तरे दिली नाही. तसेच मे. बी.पी.सी.एल. चे अधिकारी यांनी याबाबतचा परिपूर्ण अहवाल दोन दिवसात सादर करणार असल्याचे सांगितले. सदर सुनावणीस इतर आरोपी/अपचारी यांना पुरेशी संधी देऊन देखील ते सदर सुनावणीसही उपस्थित राहिले नाहीत.

सदर प्रकरणी अंतरीम आदेशाच्या अंमलबजावणीच्या वेळी नमूद दोन टॅंकर्समध्ये फेरवजनाच्या वेळी साठा अतिरिक्त आढळून आला. तथापी, सदर बल्कमधील गॅसचा साठा मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. येथे उतरवल्यानंतर प्रत्यक्षात सिलेंडरमध्ये भरणा दिलेल्या सिलेंडरच्या आकडेवारी नुसार गॅसचा साठा कमी आढळून आल्याचा फिरते पथकाकडून खालीलप्रमाणे अहवाल प्राप्त झाला आहे.

दिनांक ११/०३/२०१३ रोजी फिरते पथकामार्फत पोलिस तसेच पंचांसमक्ष कॅप्सुल टॅंकर क्रमांक एमएच-०६-अेक्यु-५४०२ व एमएच-०४-ईएल-८७३३ या दोन टॅंकर मधील एल.पी.जी. गॅसचा साठा मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम या कंपनीच्या बुलेट टॅंकमध्ये प्लॉट ऑफिसर धनेश शरद संपत यांचेसमक्ष उतरविण्यात आला व सदरचा उतरविण्यात आलेला साठा हा प्रत्यक्षात सिलेंडरमध्ये भरला असता त्यामध्ये तफावत आढळुन आल्याने फिरते

पथकास मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. या कंपनीचे प्लॉट ऑफिसर धनेश शरद संपत यांनी दिलेल्या लेखी जबाबात, दिनांक ११/०३/२०१३ रोजी माझ्या कंपनीमध्ये पोलिस अधिकारी, वजनमापे अधिकारी तसेच रेशनिंग अधिकारी यांनी भेट दिली. सदर कंपनीवर दिनांक ०६/०२/२०१३ रोजी विशेष स्थानिक गुन्हा क्रमांक ०७/२०१३ नुसार गुन्हा नोंद केलेला आहे. सदर गुन्ह्यामध्ये कॅप्सुल टँकर क्रमांक एमएच-०६-अेक्यु-५४०२ व एमएच-०४-ईएल-८७३३ हे दोन्ही टँकर एल.पी.जी. गॅससह जप्त केले होते. सदर दोन्ही कॅप्सुल टँकरमधील जप्त केलेल्या एल.पी.जी. गॅसची विल्हेवाटीची प्रक्रिया करण्याकरीता सदरचे दोन्ही टँकरचे बी.पी.सी.एल. माहुल या कंपनीमध्ये नेऊन त्यांचे प्रथम वजन करण्यात आले. कॅप्सुल टँकर क्रमांक एमएच-०६-अेक्यु-५४०२ याचे एकुण ग्रॉस वेट ३३१९० कि.ग्रॅ. व कॅप्सुल टँकर क्रमांक एमएच-०४-ईएल-८७३३ याचे एकुण ग्रॉस वेट ३३९६० कि.ग्रॅ. एवढे झाले. सदरचे नमूद दोन्ही टँकरपैकी कॅप्सुल टँकर क्रमांक एमएच-०४-ईएल-८७३३ हा टँकर सायंकाळी ४.१० वाजता बुलेट टँकला जोडण्यात आला व त्यामधील एल.पी.गॅस व वेपर काढुन सदरचा टँकर सायंकाळी ६.२० वाजता रिकामा करुन बाजुला ठेवला व त्यानंतर कॅप्सुल टँकर क्रमांक एमएच-०६-अेक्यु-५४०२ हा सायंकाळी ६.२५ वाजता बुलेट टँक क्रमांक दोनला जोडण्यात आला व त्यामधील एल.पी.जी. गॅस व वेपर काढुन घेवुन तो रात्री ९.४५ वाजता रिकामा करण्यात आला. कॅप्सुल टँकर क्रमांक एमएच-०४-ईएल-८७३३ हा टँकर बुलेट क्रमांक एक मध्ये खाली करत असताना सिलेंडर फिलिंगचे काम चालु ठेवण्यात आले होते. त्यावेळी घरगुती वापराचे १४.२ कि.ग्रॅ.चे एकुण १३९९ सिलेंडर भरण्यात आले तर व्यवसायिक वापराचे १९ कि.ग्रॅ.चे एकुण ३३ सिलेंडर भरण्यात आले. या दोन्ही क्षमतेच्या सिलेंडरमध्ये एल.पी.जी. गॅसचा २०४९२.८० कि.ग्रॅ. एवढा साठा भरण्यात आला. त्यानंतर अधिकाऱ्यांनी माझ्या समक्ष बुलेट नं. एक व दोन मधील एल.पी.जी. गॅस साठ्याची मोजदाद केली असता बुलेट नं. १ मध्ये ५५६९.३४ कि.ग्रॅ., बुलेट नं. २ मध्ये ८८१५.५७ कि.ग्रॅ. असे मिळुन एकुण दोन्ही टाक्यांमध्ये १४३८४.९१ कि.ग्रॅ. एल.पी.जी. गॅसचा साठा शिल्लक असल्याचे आढळुन आले. सदर साठ्यामध्ये घरगुती व व्यवसायिक वापराच्या सिलेंडरमध्ये भरण्यात आलेल्या २०४९२.८० कि.ग्रॅ. गॅस साठा जमा करता एकुण ३४८७७.७१ कि.ग्रॅ. गॅस साठ्याची आकडेवारी आढळुन आली. माझ्या कंपनीमध्ये वर नमूद दोन्ही टँकरमधील मिळुन एकुण ३४८७७.७१ कि.ग्रॅ. एल.पी.जी. गॅसचा साठा मला प्राप्त झाला. अधिकाऱ्यांनी माझ्याकडे वर नमूद दोन्ही टँकरच्या बी.पी.सी.एल. कंपनीकडील ईनव्हाईच्या प्रतीवर मुळ एल.पी.जी. गॅस किती भरला ? याची विचारणा केली असता मी ईनव्हाईसच्या डुप्लीकेट प्रती तपासणी करण्या करता सादर केल्या. टँकर क्रमांक एमएच-०४-ईएल-८७३३ याच्या एल.पी.जी.चे वर १७३९० कि.ग्रॅ. व टँकर क्रमांक एमएच-०६-अेक्यु-५४०२ याच्या एल.पी.चे वजन १७७१० कि.ग्रॅ. असे नमूद आहे. या दोन्ही टँकरमधील गॅसचे एकुण वजन ३५१०० कि.ग्रॅ. असे असताना त्याऐवजी ३४८७७.७१

कि.ग्रॅ. एवढा गॅस मिळालेला आहे. म्हणजेच २२२.२९ कि.ग्रॅ. एवढ्या गॅसचा साठा कमी मिळालेला आहे, असे नमूद आहे.

तद्नंतर मे. बी.पी.सी.एल. कंपनीच्या वतीने तपासणी कालावधीतील ई.आर.व्ही. रिसिप्टचा अहवाल तसेच वितरकनिहाय व ट्रकनिहाय सिलेंडर भरुन दिल्याबाबतचा अहवाल व सदर प्लॅंटमध्ये सिलेंडर भरुन मिळण्यासाठी संलग्न असलेल्या वितरकांच्या तपशिलासह अहवाल सादर केला आहे.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद</u> :-

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, आर.सी.एफ. पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक १४/०२/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, प्रस्तूत गुन्ह्यात जप्त केलेला एकूण किंमत रुपये १,२५,४०,२६८/- किंमतीचा माल हा पोलिसांचे ताब्यात न देता कारवाई करण्यात आलेल्या कॉन्फीडंन्स पेट्रोलियम इंडिया लि. जिजामातानगर, माहुलगाव, चेंबूर, मुंबई या ठिकाणी ठेवण्यात आला आहे. सदर मुद्देमाल हा नाशवंत, ज्वालाग्राही असल्याने तसेच वाहतुकीस अवजड असल्याने सदर मालाची आवश्यक वस्तुंबाबत अधिनियम १९५५ चे कलम ६-अ अन्वये सदर मुद्देमालाचे निर्गतीबाबत योग्य ती प्रक्रिया सुरु करण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

दिनांक २७/०२/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित टॅंकर क्र. एमएच ०४ इएल ८७३३ चे मालक श्रीकांत धोंडीराम कटके यांनी युक्तीवाद केला की, टॅंकर क्र. एमएच ०४ इएल ८७३३ यामध्ये चलनावरील ग्रॉसवेट ३३९५० असतांना तपासणीतील ग्रॉस वेट ३३९०० म्हणजे ५० किलोने कमी असल्याचे आढळून आले आहे. त्या अनुषंगाने खुलासा करतो की, सदर नमूद टॅंकर दि. ०४/०२/२०१३ रोजी भारत पेट्रोलियम कॉर्पो. लि., माहुल, चेंबूर कंपनीमध्ये BULK LPG भरुन सुमारे २ कि.मी. अंतरावरील मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम या कंपनीत खाली करण्याकरिता पार्किंगमध्ये उभा होता. त्या दरम्यान आपल्या अधिकाऱ्यांनी तो टॅंकर दि.०५/०२/२०१३ रोजी BULK LPG भरलेल्या अवस्थेत सूंपर्ण इंजिन सहीत टॅंकरचे वजन केले. त्यामध्ये ५० किलोचा फरक आढळला. त्याबाबत तो निदर्शनास आणू इच्छितो की, तो भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. चा अधिकृत BULK LPG वहातूकदार असून मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. बरोबर दि.२२/०८/२०१२ रोजी झालेल्या अधिकृत करारात पृष्ठ क्र. १२ वरील मुद्दा क्र. १५ प्रमाणे " For any shortages of Bulk LPG, the recovery will be made for the entire shortage, at the rate of Rs. 70/- per KG or the prevailing bulk LPG rate for non domestic use whichever is higher. However, the Corporation agrees to normally ignore any shortage up to a maximum of 40 KG per trip between the loading point and unloading point

आदेश व कायदा हा एल.पी.जी. बॉटलिंग प्लॉट यास लागू होत नाही. कारणे दाखवा नोटीसमधील नमूद मुद्दे तसेच तपासणीच्या वेळी आढळून आलेल्या त्रुटी या कंट्रोल ऑर्डर अथवा जीवनावश्यक वस्तू कायदा यांच्या तरतूदींचा भंग करणारे नाही. त्यामुळे नोटीसमधील नमूद केलेले मुद्दे हे आदेश अथवा कायदा यांचे भंग करणारे नसल्याने बजावण्यात आलेली नोटीस परत घेण्यात यावी. सदरची तपासणी ही आपल्या उपस्थितीत झाली असल्याने कलम ६-अ अंतर्गत होणारी प्रक्रिया ही आपण हाताळणे योग्य होणार नाही. त्यामुळे जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीची प्रक्रिया ही इतर स्वतंत्रीक प्राधिकारणाकडे वर्ग करण्यात यावी. बी.पी.सी.एल. कंपनीकडून टी.आर.व्ही. वॉवचर सहित येणारे रिकामे सिलेंडरमध्ये एल.पी.जी. गॅस भरुन देण्यास ते करारबध्द आहेत. रिकामे सिलेंडरचा लेखाजोखा स्वतंत्र नोंदवहीमध्ये अद्यावत ठेवण्यात येतो. बी.पी.सी.एल. कंपनीच्या खात्यामध्ये रक्कम जमा झाल्यानंतर व त्यांनी निर्देशित केल्यानुसार सिलेंडरमध्ये एल.पी.जी. भरुन देण्यात येतात व सदर भरलेले सिलेंडर हे रितसर चलन तयार करुन देण्यात येतात. करारनाम्याच्या अटी व शर्तीनुसार एल.पी.जी. चा बल्कमधील साठा कंपनीतील प्रत्येकी १० मे. टन क्षमतेच्या बुलेट टँकमध्ये साठवणूक केले जात असून त्याची साठवणूक क्षमता एकूण २० मे. टन आहे. आवक झालेला एल.पी.जी. चा बल्कमधील साठा प्रत्यक्षात वजन करुन तसेच रोटोगेज मीटर प्रमाणे साठवणूक केला जातो. हवामानात होणाऱ्या बदलामुळे साठ्यामधील वेपरमध्ये आवश्यक बदल दिसून येतात. त्याअनुषंगाने रोटोगेज मीटर रिडिंगमध्ये लिक्विड असलेल्या साठ्याची मोजदाद केली जात असून वेपरमधील साठ्याचा त्याचा संबंध नाही. तपासणीमध्ये १६९६४.९२ किलो ग्रॅम एल.पी.जी. चा साठा कमी आढळून आल्याचे नमूद आहे. परंतू टँकर क्र. एमएच-०४-ईएल-८७३३ मधील १७३४० किलो एल.पी.जी. च्या साठ्याची कंपनीच्या सॅप सिस्टममध्ये नोंद झाली. परंतू टँकरमधील साठा प्रत्यक्षात टाक्यांमध्ये उतरवून घेतला नाही. त्यामुळे सदरचा फरक जाणवत आहे. टँकरमधील साठा जमेस दाखवता प्रत्यक्ष शिल्लक साठ्यामध्ये काहीच फरक आढळून येणार नाही. बी.पी.सी.एल. च्या अधिकाऱ्यांकडून कंपनीतील साठ्याबाबत ऑनलाईनद्वारे निरिक्षण केले जात असून त्यामध्ये कमी/अधीक प्रमाण आढळून आल्यास त्याची स्वर्वस्वी जबाबदारी कॉन्फिडन्स पेट्रोलियम कंपनीची आहे. एल.पी.जी. साठ्यामध्ये आढळून आलेला फरक हा प्रत्यक्षात मोजणीच्या वेळी हवामानात होणाऱ्या बदलामुळे होऊ शकतो. त्यामुळे एल.पी.जी. साठा व वाहन हे नमूद प्राश्र्वभूमी जाणून न घेता जप्त करण्यात आले आहे. बी.पी.सी.एल. अधिकाऱ्यांच्या सुचनेनुसार इतर तेल कंपन्यांचे सिलेंडर हे अलाहिदा काढून ठेवले जातात व त्यानुसार संबंधित कंपन्यांना पाठविले जात आहे. इतर दोन्ही कंपन्यांकडून या कंपनीचे सिलेंडर भरुन दिल्यास ते वितरण न करता अलाहिदा काढून ठेवले जात आहे. सदरची सर्व प्रक्रिया नियमितरित्या बी.पी.सी.एल. चे अधिकारी निरिक्षण करीत आहेत. तपासणीमध्ये घरगुती वापराची २०५४ सिलेंडर अतिरिक्त तसेच व्यवसायीक वापराचे १८२ सिलेंडर कमी



& DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE

आढळून आल्याचे नमूद असून त्याअनुषंगाने कंपनीच्या सॅप प्रणालीमधील दिनांक ०१/०२/२०१३ ते ०५/०२/२०१३ या कालावधीचे दैनिक अहवालाचे अवलोकन केल्यास दिनांक ३१/०१/२०१३ रोजी ७ ट्रकचे इन्व्हाईस तयार करण्यात आले होते व त्या सिलेंडरमधील गॅस त्याचदिवश भरण्यात आले होते. परंतू प्रत्यक्षात सदर ७ ट्रकचे वितरणाची नोंद गेट रजिस्टरमध्ये दिनांक ०१/०२/२०१३ रोजी झाली आहे. नोटीसमधील पान क्र. ५६ व ५७ मध्ये तपासणी अधिकाऱ्यांनी ४३९७४ घरगुती वापराचे सिलेंडर दिनांक ०१/०२/२०१३ ते ०५/०२/२०१३ या कालावधीमध्ये वापरण्यात आल्याचे नमूद केले आहे. सदरची आकडेवारी चुकीची असून प्रत्यक्षात ४३९२८ सिलेंडर असणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे व्यवसायीक वापराचे ६५१६ ऐवजी ६६९८ सिलेंडर नमूद करणे आवश्यक आहे. सदरची आकडेवारी दिनांक ०१/०२/२०१३ ते ०५/०२/२०१३ रोजीच्या सॅप प्रणालीमधील अहवालामध्ये दिसून येते. तपासणीमध्ये जप्त करण्यात आलेले ट्रक क्र. एमएच-०४-एफजे-२०८८ हे अधिकारी प्रवेश करते वेळीच भरण्यात आले होते व त्याचे चलन तयार करण्यची प्रक्रिया कार्यालयात सुरु होती. त्यामुळे सदर ट्रक व त्यामधील साठा हा अवैधरित्या कंपनीच्या बाहेर घेऊन जात असल्याची बाब चुकीची आहे. ट्रक क्र. एमएच-४३-यु-४५५६ हा ट्रक कंपनीच्या गेटमधून प्रवेश करते वेळी अडविण्यात आला आहे. सदर ट्रक मे. एमसन गॅस डिस्ट्रीब्युटर या गॅस वितरकाचा आहे. त्यामुळे ट्रकबाबत नमूद केलेले मुद्दे हे चुकीचे व बिनबुडाचे आहेत. सदर ट्रकमधील सिलेंडर बी.पी.सी.एल. कंपनीची मालमत्ता आहे व रितसर इआरव्ही सोबत पाठविण्यात आले आहे. त्यामुळे जप्त करण्यात आलेले ट्रक व त्यामधील सिलेंडर हे पार्श्वभूमी जाणून न घेता चुकीच्या पध्दतीने अधिकाऱ्यांनी जप्त केले आहे. कंपनीच्या आंवारात जप्त करण्यात आलेले घरगुती वापराचे ८७२ तसेच व्यवसायीक वापराचे ५४२ सिलेंडर असे मिळून एकूण १४१४ सिलेंडरचा साठा बी.पी.सी.एल. या कंपनीकडून उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याची रितसर नोंद घेण्यात आली आहे. त्यामुळे सदरचा साठा जप्त करण्यात येऊ नये. तपासणी अधिकाऱ्यांनी तपासणी घेऊन जप्त केलेला साठा हा केवळ ग्रहण व धारणाच्या आधारे केला असून त्यामुळे कोणत्याही आदेशांच्या तरतूदींचे भंग झाल्याचे दिसून येत नाही. कारणे दाखवा नोटीसमध्ये नमूद केलेले मुद्दे हे पूर्णपणे ग्रहण व धारणाच्या आधारे असून त्यामध्ये वस्तूस्थितीदर्शक बाबी विचारात घेतल्या नसल्याने त्यामुळे बजावण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस मागे घेण्यात यावी, असे नमूद करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २७/०२/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित ट्रक क्रमांक एमएच ४३ यू ४५५६ चे मालक तथा मे. एमसन गॅस डिस्ट्रिब्युटरचे भागीदार सैफ अब्दुल मजीद मोजावाला यांनी युक्तीवाद केला की, त्यांचा जप्त असलेला ट्रक क्रमांक एमएच ४३ यू ४५५६ हा मुक्त करण्यात यावा. जेणेकरुन गॅस ग्राहकांना सिलेंडरचे वितरण करणे शक्य होईल, असे नमूद करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

CONTROLLER OF RATIONING ... MU

दिनांक २७/०२/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित ट्रक क्रमांक एमएच ०४ एफ जे २०८८ चे मालक तथा मे. आनंद गॅस सर्व्हिसचे भागीदार विनोद राजेंद्र सिंग यांनी युक्तीवाद केला की, त्यांचा जप्त असलेला ट्रक क्रमांक एमएच ०४ एफ जे २०८८ हा मुक्त करण्यात यावा. जेणेकरुन गॅस ग्राहकांना सिलेंडरचे वितरण करणे शक्य होईल. सदर ट्रक मुक्त करण्याच्या प्रक्रियेमध्ये आपल्या कार्यालयाकडून पारीत केलेल्या आदेशानुसार पालन करण्यात येईल, असे नमूद करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, आर.सी.एफ. पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक २८/०२/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, गुन्ह्यातील मुद्देमालापैकी १) कॅप्सुल टँकर क्र. एमएच-०४-ईएल-८७३३, २) एमएच-०६-एक्यु-५४०२ या टँकरमध्ये एलपीजी गॅस भरलेला असून तो गॅस हा नाशवंत, ज्वालाग्राही असल्याने तसेच वाहतूकीस अवजड असल्याने तसेच मोटार ट्रक गॅस सिलेंडर भरलेले एमएच-०४-एफजे-२०८८ त्यामध्ये २५२ घरगुती व ३६ व्यवसायीक गॅसचे भरलेले सिलेंडर यामध्ये गॅस भरलेला आहे. सदर गॅस हा ज्वालाग्राही असल्याने व तो इतर ठिकाणीही मोठ्या प्रमाणावर ठेवणे हे धोकादायक असल्याने त्याचे निर्गतीबाबत तात्काळ आदेश होणे आवश्यक आहे, असे नमूद केले आहे.

दिनांक १२/०३/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. व्ही.एम. हातिसकर यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे सादर केलेल्या लेखी अभिवेदनात, आपल्या अंतरीम आदेशास अनुसरुन १) कॅप्सुल टँकर क्र. एमएच-०४-ईएल-८७३३, २) एमएच-०६-एक्यु-५४०२ मधील एलपीजी साठा हा बीपीसीएल कंपनीमार्फत मे. कॉन्फिडन्स पेट्रोलियम इंडिया लि. या कंपनीस वितरीत करण्यात आला असून शिधावाटप खात्याचे मुख्य तपासणी अधिकारी, बीपीसीएल कंपनीचे अधिकारी, वैध मापन विभाग चेंबूरचे निरीक्षक व दोन्ही कॅप्सुल टँकरचे मालक यांचे समक्ष बीपीसीएल कंपनीत जाऊन उपरोक्त भरलेले व गॅस खाली केल्यानंतर पुन्हा वजन करण्यात आले. टँकर एमएच-०४-ईएल-८७३३ चे गॅस टँकरचे वजन (रिकाम्या) १५४१० कि.ग्रॅ. व गॅसचे १७७८० कि.ग्रॅ. असे मिळून गॅस टँकरचे गॅससह वजन ३३१९० कि.ग्रॅ. व एमएच-०६-एक्यु-५४०२ चे गॅस टँकरचे वजन (रिकाम्या) १६४५० कि.ग्रॅ. व गॅसचे १७५१० कि.ग्रॅ. असे मिळून गॅस टँकरचे गॅससह वजन ३३९६० कि.ग्रॅ. आढळले. यानंतर सदर प्रक्रियेचा पंचनामा करण्यात आला असून निरीक्षक वैधमापन शास्त्र, चेंबूर विभाग यांनी देखील त्यांचा अहवाल दिलेला असून त्याच्या प्रती सोबत जोडण्यात आलेल्या आहेत. नोटीसमधील दिलेले ट्रक क्र. एमएच ०४ एफजे २०८८ व एमएच ४३ यु ४५५६ चे चालक व मालक यांचेकडे तपास केला असता, सदर ट्रकवर क्लिनर हे ठेवलेले नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. जप्त मुद्देमाल अ.क्र. १ ते ५ - ट्रक क्र. एमएच ०४ एफजे २०८८ या ट्रकबाबत व त्याचेतील मालाबाबत तपास करता आनंद गॅस डिस्ट्रिब्युटर्स यांनी इआरव्ही कॉपीमध्ये

छोटे सिलेंडर २४२ व मोठे सिलेंडर ३६ ची मागणी करुन चालकासोबत पाठविली असून सदर गाडीची मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. या कंपनीच्या गेटवर असलेल्या रजिस्टरवर आत आल्याची नोंद आहे व सदर गाडीतील गॅस सिलेंडर हे मे. कॉन्फिडन्स पेट्रो. इंडिया लि. या कंपनीमध्ये फ्लोअरवर काढून ठेवण्यात आलेले असून सदर गॅस सिलेंडरबाबत निरीक्षक वैध मापन शास्त्र, चेंबूर विभाग यांनी स्वतंत्र कारवाई केलेली आहे. सदर सिलेंडर हे एलपीजी गॅसने भरलेले असल्यामुळे व सदर गॅस हा ज्वलनशिल असल्यामुळे त्याची विल्हेवाट त्वरीत लावणे आवश्यक आहे. जप्त मुद्देमाल अ.क्र. ६ ते १० - ट्रक क्र. एमएच ४३ यु ४५५६ या ट्रकबाबत व त्याचेतील मालाबाबत तपास करता एम्सन गॅस डिस्ट्रीब्युटर्स यांनी इआरव्ही कॉपीमध्ये छोटे सिलेंडर २०४ व मोठे सिलेंडर ७२ ची मागणी करुन चालकासोबत पाठविली असून सदरच्या ट्रकमध्ये २०४ छोटे व ७२ मोठे सिलेंडर रिकामे स्थितीत असून जप्त मुद्देमाल नोंद क्र. ७ व ९ मध्ये सदरचे गॅस सिलेंडर हे भरलेल्या स्थितीत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. परंतू सदर ट्रकचे चालकास अटक केली असता, त्याचे म्हणणेनुसार सदरचे गॅस सिलेंडर हे रिकामे आहेत. तरी जप्त मुद्देमाल नोंद क्र. ७ व ९ बाबत खातरजमा होणेस विनंती आहे. जप्त मुद्देमाल अ.क्र. ११ ते १२ - बाबत तपास करता सदर सिलेंडर हे संबंधीत वितरण कंपन्याकडून वेगवेगळ्या वेळी मे. कॉन्फिडन्स पेट्रोलियम इंडिया लि. या कंपनीकडे आल्याबाबत यातील धनेश संपत याने सांगितलेले असून सदरचे सिलेंडर एक गठ्ठा झाल्यानंतर ते संबंधीत कंपनीस देऊन त्याऐवजी त्यांचेकडे अशाच पध्दतीने जमा झालेले बीपीसीएल कंपनीचे गॅस सिलेंडर बदली करुन घेतले जातात. तरी सदर जप्त मुद्देमाल क्र. ११ ते १२ बाबत योग्य आदेश होणेस विनंती आहे. जप्त मुद्देमाल अ.क्र. १३ ते १४ - मध्ये जप्त करण्यात आलेले घरगुती वापराचे ८७२ व मोठे व्यवसायीक ५४२ सिलेंडर असून त्याबाबत आरोपी धनेश संपत याने सदर सिलेंडर हे त्यांना प्लॅन्ट वापरण्याकरिता देण्यात आलेले सिलेंडर असल्याचे सांगितलेले असून त्याचे विवरण दर महिन्यास ते बीपीसीएल कंपनीस देत असतात, असे त्याने सांगितलेले आहे. तरी उक्त मुद्देमालाबाबत योग्य आदेश होण्यास विनंती आहे. जप्त मुद्देमाल अ.क्र. १४ ते १८ - मध्ये जप्त करण्यात आलेल्या कॅप्सुल टॅंकर क्र. १) एमएच-०४-ईएल-८७३३ २) एमएच-०६-एक्यु-५४०२ मधील एलपीजी गॅसबाबत (जप्त मुद्देमाल नोंदणी क्र. १६ व १८ बाबत) आपण मुद्देमाल निर्गतीबाबत अंतरीम आदेश दिलेले असून त्याची पूर्तता करण्यात आलेली आहे व त्या संबंधीचे कागदपत्रे सोबत जोडण्यात आलेली आहेत. तरी मुद्देमाल नोंद क्र. १५ व १७ बाबत योग्य ते आदेश होणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

दिनांक १२/०३/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. चे प्रशासकिय व्यवस्थापक भरत ठक्कर व मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. चे प्लॉट ऑफिसर धनेश शरद संपत यांनी सादर केलेल्या संयुक्त लेखी निवेदनात, त्यांची कंपनी नोंदणीकृत असलेले पब्लिक लिमिटेड कंपनी असून त्याचे मुख्यालय

CONTROLLER OF RATIONING ... MUM

नागपूर येथे आहे. कंपनीच्या वतीने मे. बी.पी.सी.एल. या कंपनीचे घरगुती व व्यवसायीक वापराचे सिलेंडर भरुन दिले जातात व चेंबूर येथील बॉटलिंग प्लॉटकरीता ते संबंधित तेल कंपनीसोबत करारबध्द आहेत. सदर प्रकरणी, त्यांची कंपनी डिलर अथवा वितरक नसून बॉटलिंग प्लॉटमध्ये त्यांच्या कामाचा स्वरुप हा सर्व्हिस उपलब्ध करुन देण्याचा असून मार्केटिंग, विक्री अथवा वितरणाच्या प्रक्रियेमध्ये ते समाविष्ठ नसून सदरची प्रक्रिया मे. बी.पी.सी.एल. या कंपनीने नेमलेल्या वितरकामार्फत करण्यात येते. सदर साठ्याची मार्केटिंग, विक्री व विरण वितरकांमार्फत होत असल्याने तसेच तो अनुदानित असल्याने त्यास लिक्विफाईट पेट्रोलियम गॅस ऑर्डर, २००० व जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ लागू होत आहे. परंतू सदरचे आदेश व कायदा हा एल.पी.जी. बॉटलिंग प्लॉट यास लागू होत नाही. कारणे दाखवा नोटीसमधील नमूद मुद्दे तसेच तपासणीच्या वेळी आढळून आलेल्या त्रुटी या कंट्रोल ऑर्डर अथवा जीवनावश्यक वस्तू कायदा यांच्या तरतूदींचा भंग करणारे नाही. त्यामुळे नोटीसमधील नमूद केलेले मुद्दे हे आदेश अथवा कायदा यांचे भंग करणारे नसल्याने बजावण्यात आलेली नोटीस परत घेण्यात यावी. सदरची तपासणी ही आपल्या उपस्थितीत झाली असल्याने कलम ६-अ अंतर्गत होणारी प्रक्रिया ही आपण हाताळणे योग्य होणार नाही. त्यामुळे जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीची प्रक्रिया ही इतर स्वतंत्रीक प्राधिकारणाकडे वर्ग करण्यात यावी. बी.पी.सी.एल. कंपनीकडून टी.आर.व्ही. वॉवचर सहित येणारे रिकामे सिलेंडरमध्ये एल.पी.जी. गॅस भरुन देण्यास ते करारबध्द आहेत. रिकामे सिलेंडरचा लेखाजोखा स्वतंत्र नोंदवहीमध्ये अद्यावत ठेवण्यात येतो. बी.पी.सी.एल. कंपनीच्या खात्यामध्ये रक्कम जमा झाल्यानंतर व त्यांनी निर्देशित केल्यानुसार सिलेंडरमध्ये एल.पी.जी. भरुन देण्यात येतात व सदर भरलेले सिलेंडर हे रितसर चलन तयार करुन देण्यात येतात. करारनाम्याच्या अटी व शर्तीनुसार एल.पी.जी. चा बल्कमधील साठा कंपनीतील प्रत्येकी १० मे. टन क्षमतेच्या बुलेट टँकमध्ये साठवणूक केले जात असून त्याची साठवणूक क्षमता एकूण २० मे. टन आहे. आवक झालेला एल.पी.जी. चा बल्कमधील साठा प्रत्यक्षात वजन करुन तसेच रोटोगेज मीटर प्रमाणे साठवणूक केला जातो. हवामानात होणाऱ्या बदलामुळे साठ्यामधील वेपरमध्ये आवश्यक बदल दिसून येतात. त्याअनुषंगाने रोटोगेज मीटर रिडिंगमध्ये लिक्विड असलेल्या साठ्याची मोजदाद केली जात असून वेपरमधील साठ्याचा त्याचा संबंध नाही. तपासणीमध्ये १६९६४.९२ किलो ग्रॅम एल.पी.जी. चा साठा कमी आढळून आल्याचे नमूद आहे. परंतू टँकर क्र. एमएच-०४-ईएल-८७३३ मधील १७३४० किलो एल.पी.जी. च्या साठ्याची कंपनीच्या सॅप सिस्टममध्ये नोंद झाली. पंरतू टँकरमधील साठा प्रत्यक्षात टाक्यांमध्ये उतरवून घेतला नाही. त्यामुळे सदरचा फरक जाणवत आहे. टँकरमधील साठा जमेस दाखवता प्रत्यक्ष शिल्लक साठ्यामध्ये काहीच फरक आढळून येणार नाही. बी.पी.सी.एल. च्या अधिकाऱ्यांकडून कंपनीतील साठ्याबाबत ऑनलाईनद्वारे निरिक्षण केले जात असून त्यामध्ये कमी/अधीक प्रमाण आढळून आल्यास त्याची



DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE

स्वर्वस्वी जबाबदारी कॉन्फिडन्स पेट्रोलियम कंपनीची आहे. एल.पी.जी. साठ्यामध्ये आढळून आलेला फरक हा प्रत्यक्षात मोजणीच्या वेळी हवामानात होणाऱ्या बदलामुळे होऊ शकतो. त्यामुळे एल.पी.जी. साठा व वाहन हे नमूद प्रार्श्वभूमी जाणून न घेता जप्त करण्यात आले आहे. बी.पी.सी.एल. अधिकाऱ्यांच्या सुचनेनुसार इतर तेल कंपन्यांचे सिलेंडर हे अलाहिदा काढून ठेवले जातात व त्यानुसार संबंधित कंपन्यांना पाठविले जात आहे. इतर दोन्ही कंपन्यांकडून या कंपनीचे सिलेंडर भरुन दिल्यास ते वितरण न करता अलाहिदा काढून ठेवले जात आहे. सदरची सर्व प्रक्रिया नियमितरित्या बी.पी.सी.एल. चे अधिकारी निरिक्षण करीत आहेत. तपासणीमध्ये घरगुती वापराची २०५४ सिलेंडर अतिरिक्त तसेच व्यवसायीक वापराचे १८२ सिलेंडर कमी आढळून आल्याचे नमूद असून त्याअनुषंगाने कंपनीच्या सॅप प्रणालीमधील दिनांक ०१/०२/२०१३ ते ०५/०२/२०१३ या कालावधीचे दैनिक अहवालाचे अवलोकन केल्यास दिनांक ३१/०१/२०१३ रोजी ७ ट्रकचे इन्व्हाईस तयार करण्यात आले होते व त्या सिलेंडरमधील गॅस त्याचदिवशी भरण्यात आले होते. परंतू प्रत्यक्षात सदर ७ ट्रकचे वितरणाची नोंद गेट रजिस्टरमध्ये दिनांक ०१/०२/२०१३ रोजी झाली आहे. नोटीसमधील पान क्र. ५६ व ५७ मध्ये तपासणी अधिकाऱ्यांनी ४३९७४ घरगुती वापराचे सिलेंडर दिनांक ०१/०२/२०१३ ते ०५/०२/२०१३ या कालावधीमध्ये वापरण्यात आल्याचे नमूद केले आहे. सदरची आकडेवारी चुकीची असून प्रत्यक्षात ४३९२८ सिलेंडर असणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे व्यवसायीक वापराचे ६५१६ ऐवजी ६६९८ सिलेंडर नमूद करणे आवश्यक आहे. सदरची आकडेवारी दिनांक ०१/०२/२०१३ ते ०५/०२/२०१३ रोजीच्या सॅप प्रणालीमधील अहवालामध्ये दिसून येते. तपासणीमध्ये जप्त करण्यात आलेले ट्रक क्र. एमएच-०४-एफजे-२०८८ हे अधिकारी प्रवेश करते वेळीच भरण्यात आले होते व त्याचे चलन तयार करण्याची प्रक्रिया कार्यालयात सुरु होती. त्यामुळे सदर ट्रक व त्यामधील साठा हा अवैधरित्या कंपनीच्या बाहेर घेऊन जात असल्याची बाब चुकीची आहे. ट्रक क्र. एमएच-४३-यु-४५५६ हा ट्रक कंपनीच्या गेटमधून प्रवेश करते वेळी अडविण्यात आला आहे. सदर ट्रक मे. एमसन गॅस डिस्ट्रीब्युटर या गॅस वितरकाचा आहे. त्यामुळे ट्रकबाबत नमूद केलेले मुद्दे हे चुकीचे व बिनबुडाचे आहेत. सदर ट्रकमधील सिलेंडर बी.पी.सी.एल. कंपनीची मालमत्ता आहे व रितसर इआरव्ही सोबत पाठविण्यात आले आहे. त्यामुळे जप्त करण्यात आलेले ट्रक व त्यामधील सिलेंडर हे पार्श्वभूमी जाणून न घेता चुकीच्या पध्दतीने अधिकाऱ्यांनी जप्त केले आहे. कंपनीच्या आवारात जप्त करण्यात आलेले घरगुती वापराचे ८७२ तसेच व्यवसायीक वापराचे ५४२ सिलेंडर असे मिळून एकूण १४१४ सिलेंडरचा साठा बी.पी.सी.एल. या कंपनीकडून उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याची रितसर नोंद घेण्यात आली आहे. त्यामुळे सदरचा साठा जप्त करण्यात येऊ नये. तपासणी अधिकाऱ्यांनी तपासणी घेऊन जप्त केलेला साठा हा केवळ ग्रहण व धारणाच्या आधारे केला असून त्यामुळे कोणत्याही आदेशाच्या तरतूदींचे भंग झाल्याचे

CONTROLLER OF RATIONING ... HEA... MU...

दिसून येत नाही. कारणे दाखवा नोटीसमध्ये नमूद केलेले मुद्दे हे पूर्णपणे ग्रहण व धारणाच्या आधारे असून त्यामध्ये वस्तूस्थितीदर्शक बाबी विचारात घेतल्या नसल्याने त्यामुळे बजावण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस मागे घेण्यात यावी. महोदया, त्यांच्या अधिकाऱ्यांना मराठी भाषा ज्ञात नसल्याने तपासणीच्या दिवशी माहितीबाबत गैरसमज निर्माण झाल्याने सदर तपासणीच्या दिवशी दिनांक ०५/०२/२०१३ रोजी ते सकाळपासून निरंतर १५ ते २० तास होणाऱ्या तपासणीमध्ये उभे असल्याने ते थकले होते. तद्नंतर तपासणीच्या वेळी तपासणी पथकाने काढलेली आकडेवारीची त्यांच्याकडून पुर्नतपासणी करुन घेतली नव्हती व त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी संधी देण्यात आली नाही. त्यामुळे दाखल करण्यात आलेला गुन्हा हा आधारभुत मुद्यांवर अवलंबून नाही, असे नमूद केले आहे.

दिनांक १२/०३/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित ट्रक क्र. एमएच ०४ एफ जे २०८८ चे चालक विजयकुमार जवाहरलाल कनोजिया यांनी युक्तीवाद केला की, दिनांक ०४/०२/२०१३ रोजी ०८:२० वाजता ई.आर.व्ही. क्र. ८१३१७०२५० नुसार सानुज प्लांट मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. मध्ये जाऊन गेटवर ई.आर.व्ही. जमा केले. जमा केल्यानंतर गाडी प्लांटच्या मध्ये घेऊन गेलो. प्रचलित प्रध्दतीनुसार प्लांटमधील माथाडी कामगार यांनी खाली सिलेंडर उतरविले आणि पुन्हा प्लांटमधील माथाडी कामगारांनी त्यांच्या गाडीमध्ये २५२+३६ सिलेंडर भरलेले लोड केले. लोड केल्यानंतर त्याने सिलेंडर मोजले आणि मोजल्यानंतर तो इनव्हाईस घेण्यासाठी आतमध्ये गेलो. इतक्यात आपल्या कार्यालयातील अधिकाऱ्यांनी त्याला पकडले. त्याने कोणतेही चुकीचे काम केलेले नसून तो निर्दोष आहे. तरी त्यास न्याय द्यावा, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १२/०३/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित ट्रक क्र. एमएच ४३ यू ४५५६ चे चालक बिरेंद्र कुमार कनोजिया यांनी युक्तीवाद केला की, तो एमसन गॅस डिस्ट्रीब्युटर चा वाहन चालक आहे. त्याची गाडी क्र.एमएच ४३ यू ४५५६ असून दिनांक ०५/०२/२०१३ रोजी संध्याकाळी ०४:४५ वाजता कॉन्फीडन्स प्लांट (सानुज) मध्ये त्याची गाडी २०४+७२ खाली सिलेंडर घेऊन गेली. त्याच्या गाडीचा ई.आर.व्ही. क्र. ८१३१७२६४७ दिनांक ०४/०२/२०१३ आहे. त्याने वॉचमन याला एक प्रत दिली आणि गाडी आतमध्ये घेऊन गेलो. त्याच दरम्यान आपला प्रवेश झाल्याने वॉचमन याने त्याच्या गाडीची नोंद रजिस्टरमध्ये केली नाही. त्याने कोणतेही चुकीचे काम केलेले नाही. तरी त्यास न्याय मिळावा, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE ...BAI

दिनांक १२/०३/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित टँकर क्र. एमएच ०६ अेक्यू ५४०२ चे चालक संजय गंगा यादव यांनी युक्तीवाद केला की, तो गाडी क्र. एमएच ०६ अेक्यू ५४०२ चा चालक असून तो निवेदन करतो की, तो निर्दोष असून त्यास दोषमुक्त करावे. तो मागील एक महिन्यापासून घरीच असून त्यामुळे त्याच्या घराची

हालत खराब आहे. त्यास दोषमुक्त केल्यास तो काही काम करु शकतो. सदर गाडी लवकरात लवकर मुक्त करावी, जेणेकरुन त्याची रोजी रोटी चालू शकेल, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

टँकर क्र. एमएच ०४ इएल ८७३३ चे मालक श्रीकांत धोंडीराम कटके याचे दिनांक १३/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, दिनांक ०४/०३/२०१३ च्या आदेशाप्रमाणे एल.पी.जी. गॅस साठ्याचे रकमेचे क्षतिपुर्ती बंधपत्रे मा. पोलिस निरीक्षक, आर.सी.एफ. पोलिस स्टेशन यांच्याकडे सुपूर्द केली आहेत व त्यातील आदेशाप्रमाणे दिनांक ११/०३/२०१३ रोजी आमच्या कॅप्सुल टँकरचे वजन करुन शिधावाटप अधिकारी, वजनमापे अधिकारी, पोलिस निरिक्षक, बी.पी.सी.एल. चे अधिकारी व त्यांच्या सहित इतर पंचांसमक्ष त्यातील बल्क एल.पी.जी. गॅस रिकाम करण्यात आला. त्यात घट आढळुन आली नाही, त्यास्तव त्यांना दोषमुक्त करावे. त्यांच्याकडे फक्त एकच कॅप्सुल टँकर असल्या कारणाने उत्पन्नाचे एकमेव साध आहे व हाच व्यवसाय खंडीत होत असल्याकारणाने सहानभुतिपुर्वक विचार करुन सदर कॅप्सुल टँकर परत करण्याची विनंती करुन, तसे निवेदन सादर केले आहे.

टँकर क्र. एमएच ०६ अेक्यू ५४०२ चे मालक गुरुप्रित सिंग सैनी याचे दिनांक १५/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच ०६ अेक्यू ५४०२ मधील एल.पी.जी. गॅसचा साठा हा सानुज बॉटलिंग प्लॉट (कॉन्फिडन्स पेट्रोलियम) येथे उतरविण्यात आला आहे. दिनांक ११/०३/२०१३ रोजी उतरविण्यात आलेल्या गॅसच्या साठ्यामध्ये फेरवजनानंतर ७० कि.ग्रॅ. अतिरिक्त साठा आढळुन आला आहे. टँकरमधील गॅसच्या साठ्याबाबत संबंधित पोलिस ठाणे येथे बंधपत्र देण्यात आले असुन सदरचे टँकर हे त्यांच्या उत्पन्नाचे एकमेव साधन असल्याने तात्काळ मुक्त करण्यात यावे अशी विनंती करुन, तसे निवेदन सादर केले आहे.

<u>निष्कर्ष :-</u>

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक ०५/०२/२०१३ रोजी मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम लि. या कंपनीमध्ये बीपीसीएल कंपनीकडून प्राप्त झालेल्या बल्क एलपीजी साठयामधून कमी प्रमाणात सिलेंडर्स भरुन शिल्लक राहिलेल्या साठयातून कंपनीच्या ताब्यात असलेल्या सिलेंडर्समध्ये अनधिकृतरित्या गॅसचा साठा भरुन तो बेमालूमपणे अवैधरित्या व गैरमार्गाने विक्री करीत असल्याबाबत या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार या कार्यालयाच्या अधिपत्याखालील उपनियंत्रक शिधावाटप व फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह

CONTROLLER OF RATIONING ... HEAD ... MUM

मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम लि., जिजामाता नगर, माहूल, चेंबूर, मुंबई येथे भेट दिली असता, मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. चे प्रशासकीय अधिकारी भरत प्रेमचंद ठक्कर व प्लांट ऑफिसर धनेश शरद संपत हे सिलेंडर भरलेला ट्रक हा विनाचलनाचे तसेच कोणतेही अधिकृत कागदपत्राशिवाय गैरमार्गाने विक्री करण्यासाठी कंपनीच्या बाहेर पाठवित असताना तसेच विनाकागदपत्रांचे व गेट रजिस्टरमध्ये नोंद घेतल्याशिवाय रिकाम्या सिलेंडरचा ट्रक गॅस भरण्याकरिता अनधिकृतरित्या कंपनीत प्रवेश करण्यास अनुमती दिल्याने तसेच सदर तपासणीमध्ये तेल कंपनीच्या अधिकृत आकडेवारी पेक्षा २०५४ घरगुती वापराचे सिलेंडर्स अतिरिक्त भरुन दिल्याने व या व्यतिरिक्त कंपनीच्या आवारात मिळून आलेले एचपीसीएल व आयओसी कंपनीचे सिलेंडर तसेच शेडमधील विनापुरावादर्शक कागदपत्रांची १४१४ सिलेंडरचा बेकायदेशीर साठा हा गैरमार्गाने साठवणूक केल्याचे तसेच ते स्वत:च्या आर्थिक फायद्यापोटी गैरमार्गाने अवेधरित्या विक्री करण्याच्या उद्देशाने सिलेंडरचा साठा बाळगून ठेवल्याचे सकृतदर्शनी आढळून आले आहे. त्यामुळे मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. चे सर्व संचालक व प्रशासकीय अधिकारी भरत प्रेमचंद ठक्कर व प्लांट ऑफिसर धनेश शरद संपत तसेच उपरोक्त कॅप्सुल टँकर क्रमांक एमएच ०४ इएल ८७३३ व टँकर क्रमांक एमएच ०६ अेक्यू ५४०२ चे चालक, क्लिनर आणि मालक तसेच ट्रक क्रमांक एमएच ०४ एफ जे २०८८ व ट्रक क्रमांक एमएच ४३ यू ४५५६ चे चालक, क्लिनर व मालक यांनी शासनाची तसेच पर्यायाने उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द झाल्याने सर्व संबंधितांविरुध्द आरसीएफ पोलीस ठाणे, चेंबूर येथे वि.स्था.ख.क्र. ०७/२०१३ दिनांक ०६/०२/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन एकूण रुपये १,२५,४०,२६८/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

प्रस्तूत प्रकरणी, भारत पेट्रोलियम कंपनीकडून सदर बॉटलींग प्लॉटमध्ये रिकामे सिलेंडरमध्ये एल.पी.जी. गॅस भरुन घेण्यासाठी नेमणूक केलेल्या बृहन्मुंबईतील वितरकांची यादी सादर करण्यास तेल कंपनीच्या अधिकाऱ्यांना सुचना दिल्या असता त्यांनी सदर बाबत लेखी स्वरुपात वितरकांना नेमणूक केले नसल्याचे सांगुन आवश्यकतेनुसार वितरकांना सदर बॉटलींग प्लॉटमध्ये रिफिलींग करीता पाठवित असल्याचे सांगितले. त्याअनुषंगाने घटनास्थळी बॉटलींग प्लॉटचे अधिकारी यांनी त्याबाबत कंपनीकडून तसे लेखी ऑर्डर दिली जात नाही. त्यामूळे जो ट्रक रिकामे सिलेंडर घेऊन येईल त्यांना रिकामे सिलेंडर खाली करुन भरलेले सिलेंडर लोड करुन दिले जातात असे सांगितले आहे. तपासणीच्या वेळी कंपनीच्या परिसरात उभे असलेले ट्रकची संख्या, सदरचे ट्रक हे कोठून आले व कोणत्या गॅस वितरकाशी सबंधित आहेत तसेच कंपनीमध्ये उभे असलेले ट्रक यामध्ये एकुण घरगूती व व्यवसायिक वापराचे रिकामे व भरलेले सिलेंडर या सर्व बाबींची तपशीलवार माहिती कंपनीचे प्रशासकीय प्रमुख यांचेकडे विचारणा केली असता, सदरची माहिती त्यांचेकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सांगितले.

यावरुन सदर बॉटलींग प्लॉटमध्ये अनागोंदी प्रकारचे व्यवहार सुरु असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. तपासणीच्यावेळी कंपनीच्या परिसरात एकोणीस ट्रकमध्ये ४५५४ घरगूती वापराचे तसेच ७०२ व्यावसायिक वापराचे रिकामे गॅस सिलेंडर आढळून आले. तसेच ट्रक क्रमांक एमएच ०४ एफ जे २०८८ या ट्रकमध्ये २५२ घरगूती वापराचे तसेच व्यवसायिक वापराचे ३६ भरलेले सिलेंडर आढळून आले. कंपनीच्या प्रचलित पध्दतीनुसार सिलेंडर भरुन निघालेला ट्रक हा गेटच्या बाहेर जाण्या अगोदर शेड जवळील कार्यालयात गॅस वितरकाच्या नांवे चलन बनविले जाते व तद्नंतर ट्रक गेटमधून बाहेर सोडण्यात येत असतात. परंतु सदर ट्रक क्रमांक एमएच ०४ एफ जे २०८८ हा अधिकाऱ्यांनी कंपनीच्या प्रवेशव्दारातून विनाचलन बाहेर जात असतानाच पंचासमक्ष अडविला. सदर ट्रकचे चलन तयार झालेले नसताना ते गेटच्या बाहेर विनाचलन जात असल्याचे आढळून आले ही साशंकता निर्माण करणारी बाब आहे. सदरच्या तपासणीमध्ये वैधमापन शास्त्र विभाग, या चेंबूर विभागाचे पथक या तपासणीकामी उपस्थित राहून त्यांनी सदर ट्रक क्रमांक एमएच ०४ एफजे २०८८ या ट्रकमधील भरलेल्या घरगूती व व्यवसायिक वापराचे अनुक्रमे २५२ व ३६ सिलेंडर कामगारांच्या सहाय्याने ट्रकमधून शेडमध्ये उतरवून घेतले व सदर सिलेंडरचे पुन्हा वजन करुन फेरतपासणी केली असता, त्या सिलेंडरमधील गॅस साठ्याचे निव्वळ वजन तपासणीत कमी आढळल्यामूळे वैधमापनशास्त्र अधिनियम २००९ अंतर्गत कारवाई करुन सदर सिलेंडर जप्त करुन मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. या कंपनीविरुध्द खटला नोंदविण्यात आला आहे. तद्नंतर पथकाने कंपनीमध्ये उभे असलेल्या एकूण वीस ट्रकची तपासणी केली असता, त्यापैकी ट्रक क्रमांक एमएच ४३ यू ४५५६ या ट्रकची नोंद इनवर्ड रजिस्टरमध्ये आढळून आली नाही. अधिकाऱ्यांनी कंपनीतील ट्रक व शेडमधील प्रत्यक्षात मोजदाद केलेल्या सिलेंडरच्या साठयाची कंपनीच्या बुक स्टॉकप्रमाणे तुलनात्मक पडताळणी केली असता, ट्रक क्रमांक एमएच ४३ यु ४५५६ या ट्रकमधील सिलेंडरचा साठा घरगुती वापराचे २०४ तसेच व्यवसायिक वापराचे ७२ सिलेंडर हे अतिरिक्त आढळून आले. तसेच पथकाने शेडमधील सिलेंडरची मोजदाद केली असता, त्यामध्ये घरगुती वापराचे एकूण २७२ भरलेले सिलेंडर पैकी सिल न लावेलेले ५३ सिलेंडर आढळुन येणे ही साशंकता निर्माण करणारी बाब आहे. सदर कंपनीत बीपीसीएल कंपनीचे घरगुती व व्यवसायिक वापराचे सिलेंडर भरुन दिले जात असताना प्रत्यक्षात तपासणीच्यावेळी शेडमध्ये व्यवसायिक वापराचे एचपीसीएल कंपनीचे ३६ व इण्डेन (आयओसी) या कंपनीचे ९० सिलेंडर आढळून आल्याने याबाबत अधिकाऱ्यांनी विचारणा केली असता, ते वितरकाने पाठविलेल्या ट्रकमधून आले असल्याचे उपस्थित धनेश शरद संपत यांनी मोघम स्वरुपाचे व दिशाभूल करणारे उत्तर दिले. तद्नंतर अधिकाऱ्यांनी बॉटलींग प्लॉटचा अभिलेख पडताळला असता, दिनांक ०१/०२/२०१३ ते ०५/०२/२०१३ या कालावधीत एकूण ४३९७४ घरगूती तसेच ६५१६ व्यवसायिक वापराचे सिलेंडर भरुन ट्रकमध्ये वितरण केल्याचे आढळून आले. सदरच्या वितरणाची

आकडेवारी बीपीसीएल कंपनीच्या सॅप (SAP) या अधिकृत सॉफ्टवेअरमधील संगणकीय आकडेवारीशी तुलनात्मक पडताळणी केली असता, बीपीसीएल कंपनीच्या अभिलेखानुसार नमूद कालावधीत घरगूती वापरातील ४१९२० व व्यवसायिक वापराचे ६६९८ सिलेंडर वितरण झाल्याचे दिसुन येते. म्हणजेच २०५४ घरगूती वापराचे सिलेंडर हे अतिरिक्त भरुन दिल्याचे तर व्यवसायिक वापराच्या १८२ सिलेंडर हे अधिकृत आकडेवारीपेक्षा कमी भरुन दिल्याचे आढळून आले. तद्नंतर अधिकाऱ्यांनी कंपनीच्या परिसरात असलेल्या दोन बुलेट टँकमधील एलपीजी साठयाची मोजदाद केली असता, पुस्तकी शिल्लक म्हणून २८६५७.०५ किलोग्रॅम एलपीजीचा बल्क साठा शिल्लक असणे आवश्यक असतांना प्रत्यक्षात मोजदाद मध्ये ११६९२.१३ किलोग्रॅम साठा शिल्लक असल्याचे आढळून आले. म्हणजेच एकूण १६९६४.९२ किलोग्रॅम एलपीजी साठा हा पुस्तकी शिल्लक पेक्षा कमी आढळून आल्याने सदर बॉटलिंग प्लांटमधुन गैरमार्गाने अतिरीक्त सिलेंडरमध्ये गॅस भरुन देण्यासाठी बीपीसीएल कंपनीकडून प्राप्त झालेल्या एलपीजीच्या साठयाचा वापर केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. मोजदाद करतेवेळी शेडमधील आढळून आलेले घरगुती वापराचे ८७२ व व्यावसायिक वापराचे ५४२ सिलेंडर असे मिळून एकूण १४१४ सिलेंडरबाबत अधिकाऱ्यांनी विचारणा केली असता, सदर सिलेंडरचा साठा हा कोणत्याही गॅस वितरकाशी संबंधित नसून तो त्यांच्या कंपनीचा ताब्यांत असलेला साठा असल्याचे सांगितले. परंतु त्याबाबत पुरावादर्शक कागदपत्रे उपलब्ध करुन दिले नाहीत ही बाब साशंकता निर्माण करणारी असुन यावरुन सदरचे विनापुरावादर्शक कागदपत्रांच्या आधारे कंपनीत साठवणुक केलेल्या सिलेंडरमध्ये संबंधित तेलकंपनीकडून प्राप्त झालेला बल्कमधील गॅसचा साठा भरुन सदरचे सिलेंडर हे काळयाबाजाराने विक्री करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते.

मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम लि. या बॉटलिंग प्लॉंटबाबत प्राप्त तक्रारीनुसार वितरकांकडून पाठविण्यात येणाऱ्या रिकामे सिलेंडरमध्ये कमी प्रमाणात गॅसचा साठा भरुन शिल्लक राहिलेल्या साठयातून कंपनीच्या ताब्यात असलेल्या सिलेंडर्समध्ये अनधिकृतरित्या गॅसचा साठा भरुन तो बेमालूमपणे अवैधरित्या व गैरमार्गाने विक्री करीत असल्याची खात्रीलायक बातमी या कार्यालयास प्राप्त झाली. त्याअनुषंगाने दिनांक ०५/०२/२०१३ रोजी मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम लि. या कंपनीमध्ये या कार्यालयाच्या अधिपत्त्याखालील पथकाने धाड टाकली असता, सदर बॉटलिंग प्लॉंटमध्ये बीपीसीएल कंपनीच्या बृहन्मुंबईतील गॅस वितरकांमार्फत पाठविण्यात आलेल्या घरगुती तसेच व्यवासायिक वापराच्या रिकामे गॅस सिलेंडरमध्ये बीपीसीएल या तेल कंपनीकडून प्राप्त झालेला बल्क एलपीजी साठा भरुन देण्यासाठी संबंधित सरकारी तेल कंपनीसोबत कराबद्ध असल्याचे दिसुन येते. मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडीया लि. या कंपनीच्या बॉटलिंग प्लॉंटमध्ये कार्यरत असलेले अधिकारी तसेच प्रत्यक्षात बॉटलिंग प्लॉंटमध्ये सिलेंडरचे रिफिलिंग करुन देणारे कर्मचारी यांचेकडे कंपनीचे नेमणूकीचे पत्र (अपॉईंटमेंट लेटर) उपलब्ध

OFFICE OF CIVIL SUPPLIES

झाले नाही. सदर बॉटलिंग प्लॉट हे लोकवस्तीच्या शेजारी असल्याने सदरचा ज्वलनशिल साठा हाताळणाऱ्या बॉटलींग प्लॉटच्या कर्मचाऱ्यांकडे आवश्यक प्रशिक्षण घेतल्याबाबतचे संबंधित तेल कंपनीकडील प्रशिक्षण दिल्याचे प्रमाणपत्रही उपलब्ध झाले नाही ही आश्चर्यजनक बाब आहे. वास्तविक पाहता, बीपीसीएल या सरकारी तेल कंपनीकडून खाजगी बॉटलिंग प्लॉटसोबत करारनामा करताना सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना करुन तसेच आवश्यक खबरदारी म्हणून संबंधित बॉटलिंग प्लॉटचे अधिकारी तसेच कर्मचारी यांना वेळोवेळी प्रशिक्षण देणे अभिप्रेत आहे. तथापी, सदर सरकारी तेल कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून या सर्व महत्वाच्या बाबींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन अक्षम्य निष्काळजीपणा केल्याचे दिसुन येते. उपरोक्त तपासणीमधील आढळुन आलेल्या गंभीर बाबींचे अवलोकन करता, सदर बॉटलींग प्लॉटमध्ये राजरोसपणे मनमानी कारभार सुरु असुन त्यामध्ये सदर बॉटलींग प्लॉटचे अधिकारी/कर्मचारी तसेच मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. या कंपनीचे संचालक यांनी संगनमत करुन बीपीसीएल या कंपनीकडून प्राप्त होणारा बल्कमधील एल.पी.जी. गॅसचा साठा हा वितरकांना त्यांच्या रिकामे सिलेंडरमध्ये कमी प्रमाणात भरुन देवुन तसेच जप्त केलेल्या दोन ट्रकपैकी ट्रक क्रमांक एमएच ०४ एफ जे २०८८ हा विनाचलन कंपनीच्या बाहेर जात असताना तसेच ट्रक क्रमांक एमएच ४३ यू ४५५६ या ट्रकची इनवर्ड रजिस्टरमध्ये नोंद न घेता त्या ट्रकमधील रिकामे सिलेंडरमध्ये एल.पी.जी. चा साठा भरुन दिले जात असल्याचे आढळुन आल्यामुळे तसेच तपासणी कालावधीत कंपनीच्या आकडेवारीपेक्षा अतिरिक्त सिलेंडर भरुन दिल्याचे व त्याअनुषंगाने एल.पी.जी. बल्कमधील सुटा साठा हा पुस्तकी शिल्लक साठ्यापेक्षा कमी प्रमाणात आढळुन आल्याने सर्व संबंधितांनी नमूद बॉटलींग प्लॉटमध्ये अनुदानीत एल.पी.जी. गॅसच्या साठ्याचा गैरव्यवहार करुन तसेच सिलेंडरमध्ये गैरमार्गाने गॅसचा साठा भरुन तो स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी व नफेखोरीच्या उद्देशाने काळाबाजार करीत असल्याचे सिध्द होत आहे. सदर गैरकृत्यामुळे मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. या कंपनीने मे. बी.पी.सी.एल. या सरकारी तेल कंपनी सोबत केलेल्या कराराचा भंग करुन संबंधित तेल कंपनीची व पर्यायाने शासनाची विश्वासार्हता गमावल्याचे तसेच घोर फसवणूक केल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, जप्त करण्यात आलेले एचपीसीएल तसेच इंन्डेन या कंपनीची एकुण १२६ सिलेंडर व कंपनीच्या आवारात विनापुरावादर्शक कागदपत्रांचे जप्त केलेले बीपीसीएल कंपनीचे एकुण १४१४ सिलेंडर्सचा संपुर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत गुन्हयात जप्त करण्यात आलेले ट्रक क्रमांक एमएच ०४ एफ जे २०८८ चे मालक तथा मे. आनंद गॅस सर्व्हिसचे भागीदार विनोद राजेंद्र सिंग यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्यांचा जप्त असलेला ट्रक क्रमांक एमएच ०४ एफ जे २०८८ हा मुक्त करण्यात यावा. जेणेकरुन गॅस ग्राहकांना सिलेंडरचे वितरण करणे शक्य होईल.

CONTROLLER OF RATIONING ... HEAD ... MUM

सदर ट्रक मुक्त करण्याच्या प्रक्रियेमध्ये आपल्या कार्यालयाकडून पारीत केलेल्या आदेशानुसार पालन करण्यात येईल, असे सांगितले. तसेच जप्त ट्रक क्रमांक एमएच ४३ यू ४५५६ चे मालक तथा मे. एमसन गॅस डिस्ट्रिब्युटरचे भागीदार सैफ अब्दुल मजीद मोजावाला यांनी केलेल्या खुलाशात, त्यांचा जप्त असलेला ट्रक क्रमांक एमएच ४३ यू ४५५६ हा मुक्त करण्यात यावा. जेणेकरुन गॅस ग्राहकांना सिलेंडरचे वितरण करणे शक्य होईल, असे सांगितले.

तथापी, सदर गुन्हा नोंद प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या दोन्ही ट्रकपैकी ट्रक क्रमांक एमएच ०४ एफ जे २०८८ या ट्रकमध्ये २५२ घरगूती वापराचे तसेच व्यवसायिक वापराचे ३६ भरलेले सिलेंडर हे ट्रकसहीत जप्त करण्यात आले. मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडीया लि. या कंपनीच्या प्रचलित पध्दतीनुसार सिलेंडर भरुन निघालेला ट्रक हा गेटच्या बाहेर जाण्या अगोदर शेड जवळील कार्यालयात गॅस वितरकाच्या नांवे चलन बनविले जाते व तद्नंतर ट्रक गेटमधून बाहेर सोडण्यात येत असतात. परंतु सदर ट्रक क्रमांक एमएच ०४ एफ जे २०८८ हा अधिकाऱ्यांनी कंपनीच्या प्रवेशव्दारातून विनाचलन बाहेर जात असतानाच पंचासमक्ष अडविला. सदर ट्रकचे चलन तयार झालेले नसताना ते गेटच्या बाहेर विनाचलन जात असल्याचे आढळून आले ही साशंकता निर्माण करणारी बाब आहे. तद्नंतर पथकाने कंपनीमध्ये उभे असलेल्या एकूण वीस ट्रकची तपासणी केली असता, त्यापैकी ट्रक क्रमांक एमएच ४३ यू ४५५६ या ट्रकची नोंद इनवर्ड रजिस्टरमध्ये आढळून आली नाही. अधिकाऱ्यांनी कंपनीतील ट्रक व शेडमधील प्रत्यक्षात मोजदाद केलेल्या सिलेंडरच्या साठयाची कंपनीच्या बुक स्टॉकप्रमाणे तुलनात्मक पडताळणी केली असता, ट्रक क्रमांक एमएच ४३ यु ४५५६ या ट्रकमधील सिलेंडरचा साठा घरगुती वापराचे २०४ तसेच व्यावसायिक वापराचे ७२ सिलेंडर हे अतिरिक्त आढळून आले. म्हणजेच जप्त ट्रक क्रमांक एमएच ०४ एफ जे २०८८ व त्यामधील २५२ घरगूती वापराचे तसेच व्यवसायिक वापराचे ३६ भरलेले सिलेंडर तसेच ट्रक क्रमांक एमएच ४३ यु ४५५६ व त्यामधील २०४ घरगुती वापराचे तसेच व्यावसायिक वापराचे ७२ रिकामे सिलेंडरचा साठा हा नमुद बॉटलिंग प्लँटमध्ये आणुन सदर ट्रक व त्यामधील रिकामे सिलेंडर यांची कंपनीच्या अभिलेखात रितसर नोंद न करता त्यामधील आणण्यात आलेल्या सिलेंडरमध्ये गॅसचा साठा भरुन सदरचे ट्रक व त्यामधील सिलेंडर हे विनाचलन कंपनीच्या बाहेर पाठवून सदरचे सिलेंडर काळ्याबाजाराने विक्री करण्याच्या उद्देशाने आणल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, दोन्ही ट्रकमधील जप्त करण्यात आलेल्या सिलेंडर्सचा संपूर्ण अवैध साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

तथापी, राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक २३/०५/२०१२ रोजीच्या पत्रान्वये " The seized LPG cylinder is a property of the Oil companies and therefore the premise of depositing money against the seized cylinder is not possible " असे नमूद असल्याने विविध

धाडींमध्ये जप्त करण्यात आलेल्या विविध तेल कंपन्यांचा गॅस सिलेंडरचा साठा हा संबंधित तेल कंपन्यांची मालमत्ता आहे. सबब, उपरोक्त शासनजमा केलेल्या गॅस सिलेंडरच्या साठ्याची आकारण्यात आलेली रक्कम वसूल करणे शक्य नसल्याने संदरचा जप्त गॅस सिलेंडरचा संपूर्ण साठा हा राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य यांचे मदतीने संबंधित तेल कंपनी यांना बंधपत्र घेऊन देण्यात यावा.

उपरोक्त जप्त ट्रक क्रमांक एमएच ०४ एफ जे २०८८ व एमएच ४३ यू ४५५६ हे दोन्ही ट्रक व त्यामधील सिलेंडरच्या साठयाचा दावा मे. आनंद गॅस सर्व्हिस व मे. एमसन गॅस डिस्ट्रिब्युटर या दोन्ही गॅस वितरकांनी केला असल्याने सदर गुन्हा नोंद प्रकरणीं दोन्ही ट्रकचे तथा गॅस एजन्सीचे मालक यांनी मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि., या कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यांशी संगनमत करुन त्यांच्या ताब्यातील गैरमार्गाने प्राप्त केलेल्या सिलेंडरमध्ये अवैधरित्या गॅसचा अनुदानित साठा भरुन सदरचे सिलेंडर हे काळयाबाजाराने विक्री करीत असल्याचे निष्पन्न होत आहे. यावरुन नमुद दोन्ही ट्रकचे मालक/चालक यांनी त्यांच्या ताब्यातील अथवा त्यांच्या मालकीचे असलेले दोन्ही ट्रकचा अवैध वाहतुकीसाठी गैरवापर केल्याचे दिसुन येते. या सर्व घटनाक्रमाचे अवलोकन करता, मे. आनंद गॅस सर्व्हिस व मे. एमसन गॅस डिस्ट्रिब्युटर या दोन्ही गॅस वितरकांनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी सिलेंडरचा अवैध व्यवसाय करीत असल्याचे दिसुन येत असल्याने त्यांनी संबंधित कंपनीची तसेच पर्यायाने शासनाची दिशाभुल करुन विश्वासार्हता गमावल्याचे दिसुन येत आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदर दोन्ही ट्रकच्या बाजारमुल्या एवढी प्रत्येकी संपुर्ण रक्कम भरण्यास ट्रकचे मालक तयार असल्यास, तेवढी प्रत्येकी रक्कम भरल्यानंतर सदरचे ट्रक त्यांच्या मालकास परत करण्याच्या अथवा ट्रकचे मालक तेवढी प्रत्येकी रक्कम भरण्यास तयार नसल्यास पोलिसांनी सदरचे ट्रक जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

उपरोक्त गुन्हयातील जप्त टँकर क्र. एमएच ०४ इएल ८७३३ चे मालक श्रीकांत धोंडीराम कटके यांनी सुनावणीवेळी केलेल्या खुलाशात, त्यांच्या टँकरमध्ये चलनावरील ग्रॉसवेट ३३९५० असताना तपासणीतील ग्रॉस वेट ३३९०० म्हणजे ५० किलोने कमी असल्याचे आढळून आले आहे. सदर नमूद टँकर दि. ०४/०२/२०१३ रोजी भारत पेट्रोलियम कॉर्पो. लि., माहुल, चेंबूर कंपनीमध्ये BULK LPG भरुन सुमारे २ कि.मी. अंतरावरील मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम या कंपनीत खाली करण्याकरिता पार्किंगमध्ये उभा होता. त्या दरम्यान आपल्या अधिकाऱ्यांनी तो टँकर दि.०५/०२/२०१३ रोजी BULK LPG भरलेल्या अवस्थेत सूंपर्ण इंजिन सहीत टँकरचे वजन केले. त्यामध्ये ५० किलोचा फरक आढळ्ला. त्याबाबत तो निदर्शनास आणू इच्छितो की, तो भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. चा अधिकृत BULK LPG वहातूकदार असून मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. बरोबर दि.२२/०८/२०१२ रोजी



CONTROLLER OF RATIONING HEAD MU

झालेल्या अधिकृत करारात पृष्ठ क्र. १२ वरील मुद्दा क्र. १५ प्रमाणे " For any shortages of Bulk LPG, the recovery will be made for the entire shortage, at the rate of Rs. 70/- per KG or the prevailing bulk LPG rate for non domestic use whichever is higher. However, the Corporation agrees to normally ignore any shortage up to a maximum of 40 KG per trip between the loading point and unloading point irrespective of the tank truck capacity. 'Prevailing rate' means the rate prevailing on the date of dispatch of the cargo from the loading base/nearest loading base, inclusive of all taxes." असा कंपनी बरोबर स्पष्ट करार असुन त्यानुसार त्यांनी कोणताही गुन्हा केलेला दिसून येत नाही, असे सांगितले. तसेच टँकर क्र. एमएच ०६ अेक्यू ५४०२ चे मालक म्हणुन गुरुप्रित सिंग सैनी नामे इसमाचे टपालामार्फत प्राप्त निवेदनात, जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच ०६ अेक्यू ५४०२ मधील एल.पी.जी. गॅसचा साठा हा सानुज बॉटलिंग प्लाँट (कॉन्फिडन्स पेट्रोलियम) येथे उतरविण्यात आला आहे. दिनांक ११/०३/२०१३ रोजी उतरविण्यात आलेल्या गॅसच्या साठ्यामध्ये फेरवजनानंतर ७० कि.ग्रॅ. अतिरिक्त साठा आढळुन आला आहे. टँकरमधील गॅसच्या साठ्याबाबत संबंधित पोलिस ठाणे येथे बंधपत्र देण्यात आले असुन सदरचे टँकर हे त्यांच्या उत्पन्नाचे एकमेव साधन असल्याने तात्काळ मुक्त करण्यात यावे असे नमुद आहे. उपरोक्त नमुद दोन्ही टँकरच्या मालकांपैकी टँकर क्र. एमएच ०४ इएल ८७३३ चे मालक हे सुनावणीस उपस्थित राहीले. परंतु टँकर क्र. एमएच ०६ अेक्यू ५४०२ चे मालक यांना सुनावणीस उपस्थित राहून त्यांचे लेखी अथवा मौखिक म्हणणे मांडण्यासाठी पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. यावरुन टँकर क्र. एमएच ०६ अेक्यू ५४०२ चे मालक यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते.

प्रस्तूत प्रकरणी, वरिष्ठ पोलिस निरिक्षक, आर.सी.एफ. पोलिस ठाणे यांचे सुनावणीच्या वेळी प्राप्त निवेदनात, नमूद गुन्ह्यातील जप्त मुद्देमालापैकी कॅप्सुल गॅस टँकर क्र. एमएच ०४ इएल ८७३३ व एमएच ०६ अेक्यू ५४०२ या टँकरमध्ये एल.पी.जी. गॅस भरलेला असून तो ज्वालाग्राही असल्याने तसेच वाहतूकीस अवजड असल्याने व इतर ठिकाणीही ठेवणे धोकादायक असल्याने त्याचे निर्गतीबाबत तात्काळ आदेश होण्याची विनंती केली. त्याअनुषंगाने जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालापैकी दोन कॅप्सुल गॅस टँकर वगळता उर्वरीत मुद्देमाल हा मे. कॉन्फिडन्स पेट्रोलियम इंडिया लि. या कंपनीच्या आतील परिसरात सुरक्षित ठिकाणी जतन करुन ठेवण्यात आले आहे. तथापी, कॅप्सुल गॅस टँकर क्र. एमएच ०४ इएल ८७३३ व एमएच ०६ अेक्यू ५४०२ हे मे. कॉन्फिडन्स पेट्रोलियम इंडिया लि. या कंपनीच्या बाहेर गेटजवळ उघड्यावर पार्किंग केले असल्याने त्याठिकाणी कंपनीमध्ये प्रवेश करणाऱ्या इतर कॅप्सुल टँकरच्या वाहतूकीमध्ये अडसर निर्माण होत आहे. तसेच दोन्ही कॅप्सुल टँकरमधील एल.पी.जी. गॅसचा साठा हा अतिज्वलनशिल असून तो असा उघड्यावर ठेवणे सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत

धोकादायक आहे. सबब, जप्त दोन्ही कॅप्सुल टँकरमधील एल.पी.जी. गॅसचा साठा हा ज्वलनशील असल्याने कोणतीही दुर्घटना होवू नये याकरीता दोन्ही टँकरमधील गॅसच्या साठयाबाबत अंतीम आदेशास अधिन राहुन या कार्यालयाकडून दिनांक ०४/०३/२०१३ रोजी अंतरीम आदेश पारीत करण्यात आले. सदर अंतरीम आदेशानुसार टँकरमधील गॅसचा साठा शासनजमा करुन सदर गॅस साठयाच्या रकमेचे टँकरमालकांकडून क्षतीपूर्ती बंधपत्रे घेण्यात यावेत असे नमुद आहे.

सदर प्रकरणी अंतरीम आदेशाच्या अंमलबजावणीच्या वेळी नमूद दोन टँकर्समध्ये फेरवजनाच्या वेळी साठा अतिरिक्त आढळून आला. तथापी, सदर बल्कमधील गॅसचा साठा मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. येथे उतरवल्यानंतर प्रत्यक्षात सिलेंडरमध्ये भरणा केलेल्या सिलेंडरच्या आकडेवारी नुसार गॅसचा साठा दोन्ही टँकरमध्ये मिळून एकुण २२२.२९ कि.ग्रॅ. एवढा कमी आढळून आला आहे.

दिनांक ११/०३/२०१३ रोजी फिरते पथकामार्फत पोलिस तसेच पंचासमक्ष कॅप्सुल टँकर क्रमांक एमएच-०६-अेक्यु-५४०२ व एमएच-०४-ईएल-८७३३ या दोन टँकरमधील एल.पी.जी. गॅसचा साठा मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम या कंपनीच्या बुलेट टँकमध्ये प्लॉंट ऑफिसर धनेश शरद संपत यांचेसमक्ष उतरविण्यात आला व सदरचा उतरविण्यात आलेला साठा हा प्रत्यक्षात सिलेंडरमध्ये भरला असता त्यामध्ये तफावत आढळुन आल्याने फिरते पथकास मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. या कंपनीचे प्लॉंट ऑफिसर धनेश शरद संपत यांनी दिलेल्या लेखी जबाबात, कॅप्सुल टँकर क्रमांक एमएच-०६-अेक्यु-५४०२ याचे एकुण ग्रॉस वेट ३३१९० कि.ग्रॅ. व कॅप्सुल टँकर क्रमांक एमएच-०४-ईएल-८७३३ याचे एकुण ग्रॉस वेट ३३९६० कि.ग्रॅ. एवढे झाले. सदरचे नमूद दोन्ही टँकरपैकी कॅप्सुल टँकर क्रमांक एमएच-०४-ईएल-८७३३ व एमएच-०६-अेक्यु-५४०२ हे दोन्ही टँकर बुलेट टँकला जोडण्यात आले व त्यामधील एल.पी.गॅस व वेपर काढुन सदरचे टँकर अनुक्रमे बुलेट टँक क्रमांक १ व २ मध्ये रिकामे करण्यात आले. कॅप्सुल टँकर क्रमांक एमएच-०४-ईएल-८७३३ हा टँकर बुलेट क्रमांक एक मध्ये खाली करत असताना सिलेंडर फिलिंगचे काम चालु ठेवण्यात आले होते. त्यावेळी घरगुती वापराचे १४.२ कि.ग्रॅ.चे एकुण १३९९ सिलेंडर भरण्यात आले तर व्यवसायिक वापराचे १९ कि.ग्रॅ.चे एकुण ३३ सिलेंडर भरण्यात आले. या दोन्ही क्षमतेच्या सिलेंडरमध्ये एल.पी.जी. गॅसचा २०४९२.८० कि.ग्रॅ. एवढा साठा भरण्यात आला. त्यानंतर अधिकाऱ्यांनी माझ्या समक्ष बुलेट नं. एक व दोन मधील एल.पी.जी. गॅस साठ्याची मोजदाद केली असता, बुलेट नं. १ मध्ये ५५६९.३४ कि.ग्रॅ., बुलेट नं. २ मध्ये ८८१५.५७ कि.ग्रॅ. असे मिळुन एकुण दोन्ही टाक्यांमध्ये १४३८४.९१ कि.ग्रॅ. एल.पी.जी. गॅसचा साठा शिल्लक असल्याचे आढळुन आले. सदर साठ्यामध्ये घरगुती व व्यवसायिक वापराच्या सिलेंडरमध्ये भरण्यात आलेल्या २०४९२.८० कि.ग्रॅ. गॅस साठा जमा करता एकुण ३४८७७.७१ कि.ग्रॅ. गॅस साठ्याची आकडेवारी

CONTROLLER OF RATIONING HEAD MUMBAI

आढळुन आली. माझ्या कंपनीमध्ये वर नमूद दोन्ही टॅंकरमधील मिळुन एकुण ३४८७७.७१ कि.ग्रॅ. एल.पी.जी. गॅसचा साठा मला प्राप्त झाला. अधिकाऱ्यांनी माझ्याकडे वर नमूद दोन्ही टॅंकरच्या बी.पी.सी.एल. कंपनीकडील ईनव्हाईच्या प्रतीवर मुळ एल.पी.जी. गॅस किती भरला ? याची विचारणा केली असता मी ईनव्हाईसच्या डुप्लीकेट प्रती तपासणी करण्या करता सादर केल्या. टॅंकर क्रमांक एमएच-०४-ईएल-८७३३ याच्या एल.पी.जी.चे वर १७३९० कि.ग्रॅ. व टॅंकर क्रमांक एमएच-०६-अेक्यु-५४०२ याच्या एल.पी.चे वजन १७७१० कि.ग्रॅ. असे नमूद आहे. या दोन्ही टॅंकरमधील गॅसचे एकुण वजन ३५१०० कि.ग्रॅ. असे असताना त्याऐवजी ३४८७७.७१ कि.ग्रॅ. एवढा गॅस मिळालेला आहे. म्हणजेच २२२.२९ कि.ग्रॅ. एवढ्या गॅसचा साठा कमी मिळालेला आहे, असे नमूद आहे.

उपरोक्त विवेचने व अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता, कॅप्सुल टॅंकर क्रमांक एमएच-०६-अेक्यु-५४०२ व एमएच-०४-ईएल-८७३३ या दोन्ही टॅंकरमध्ये एकुण २२२.२९ कि.ग्रॅ. एलपीजी गॅसचा साठा हा कमी मिळाल्याचे तपासणीत सिध्द झाल्याने नमुद दोन्ही टॅंकरचे चालक यांनी त्यांच्या ताब्यात असलेल्या टॅंकरमधील एलपीजी गॅसचा साठा हा मे. बीपीसीएल या सरकारी तेलकंपनीच्या माहुल प्लांटमधुन भरुन घेतल्यानंतर तो मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. या बॉटलींग प्लॉट असलेल्या नियोजीत ठिकाणी जाण्यापूर्वी दोन्ही टॅंकरच्या चालकांनी त्यांच्या टॅंकरमधुन एलपीजी गॅसचा साठा हा गैरमार्गाने अत्यंत धोकादायकपणे काढून त्याची अवैध विक्री केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. सदर दोन्ही टॅंकरमधील एकुण गॅसच्या साठयापैकी २२२.२९ कि.ग्रॅ. गॅसचा साठा वगळता उर्वरीत साठा हा मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम इंडिया लि. या नियोजीत ठिकाणी उतरविण्यात आला असल्याने सदर साठयाची किंमत वसुल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सबब, नमुद दोन्ही टॅंकरमधुन कमी मिळालेल्या एकुण २२२.२९ कि.ग्रॅ. एलपीजी गॅसच्या साठयाची किंमत संबंधित तेल कंपनीने ठरवून दिलेल्या प्रचलीत दरानुसार दोन्ही टॅंकरच्या मालकांकडून समसमान रुपाने विभागून वसुल करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

जप्त दोन्ही टॅंकरचे मालक हे मे. बीपीसीएल या तेल कंपनीसोबत एलपीजी गॅसच्या साठयाची वाहतुक करण्यास वाहतुकदार म्हणुन कारारबध्द आहेत. सदर गुन्हा नोंद प्रकरणी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या दोन्ही टॅंकरच्या चालकांनी केलेले गैरकृत्यास टॅंकर मालक म्हणुन ते ही जबाबदार आहेत. दोन्ही टॅंकरचे मालक अथवा वाहतुकदार यांनी त्यांचे टॅंकर भरल्यानंतर ते नियोजीत ठिकाणी जाते किंवा कसे ? याची पुरेपुर काळजी घेणे हे क्रमप्राप्त आहे. तथापी, सदर वस्तुस्थिती विचारात घेता टॅंकर मालकाने या कार्यालयाच्या फिरते पथकामार्फत केलेल्या कारवाईवर ताशेरे ओढून स्वतः अलिप्त असल्याचे दर्शवित आहेत. प्रस्तुत प्रकरणी सर्व संबंधितांनी जप्त कॅप्सुल टॅंकर क्रमांक एमएच-०६-अेक्यु-५४०२ व एमएच-०४-ईएल-८७३३ या दोन्ही टॅंकरमधील

एलपीजी गॅसचा साठा हा प्रत्यक्षात उपभोक्तास पूर्णपणे न देता स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी गैरमार्गाने सदर टँकरमधील गॅसचा साठा काढून गैरमार्गाने विक्री केल्याचे आढळून आल्याने त्यांनी संबधित तेल कंपनी तसेच पर्यायाने शासनाची फसवणूक केल्याचे सिध्द होत आहे. प्रस्तुत प्रकरणी टँकर मालकाच्या अपरोक्ष जरी चालकांनी त्यांचे वाहनांचा गैरवापर केला असला तरी, वाहन मालक या नात्याने त्यांनी त्यांचे वाहनांचा गैरवापर होणार नाही याची सर्वतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदर दोन्ही टँकरच्या बाजारमुल्या एवढी प्रत्येकी संपुर्ण रक्कम भरण्यास दोन्ही टँकरचे मालक तयार असल्यास, तेवढी प्रत्येकी रक्कम भरल्यानंतर सदरचे टँकर त्यांच्या मालकास परत करण्याचा अथवा टँकरचे मालक तेवढी प्रत्येकी रक्कम भरण्यास तयार नसल्यास पोलिसांनी सदरचे टँकर जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६- अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये आरसीएफ पोलीस ठाणे, चेंबूर येथे वि.स्था.ख.क्र. ०७/२०१३ दिनांक ०६/०२/२०१३ अन्वये गुन्हा नोंद मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) जप्त करण्यात आलेले बॉटलींग प्लॉटमधील एचपीसीएल कंपनीचे व्यवसायीक वापराचे रिकामे ३६ सिलेंडर, मे. इंडियन ऑईल कंपनीचे व्यवसायीक वापराचे रिकामे ९० सिलेंडर, मे. बीपीसीएल कंपनीचे घरगुती वापराचे रिकामे ८७२ सिलेंडर व व्यवसायीक वापराचे रिकामे ५४२ सिलेंडर्स असे मिळुन एकुण १५४० गॅस सिलेंडर्सचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) जप्त करण्यात आलेले ट्रक क्रमांक एमएच-०४-एफजे-२०८८ मधील २५२ घरगुती वापराचे भरलेले सिलेंडर व ३६ व्यवसायीक वापराचे भरलेले सिलेंडर तसेच ट्रक क्रमांक एमएच-४३-यु-४५५६ या ट्रकमधील २०४ घरगुती वापराचे भरलेले सिलेंडर व ७२ व्यवसायीक वापराचे भरलेले सिलेंडर असे मिळुन एकुण ५६४ गॅस सिलेंडर्सचा साठा शासनजमा करण्यात यावा.

३) उपरोक्त शासनजमा करण्यात आलेल्या संपुर्ण घरगुती व व्यवसायीक वापराच्या गॅस सिलेंडर्सचा साठा हा पोलिसांनी, राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १०, पी डिमेलो रोड, वाडीबंदर, मुंबई यांचे

मदतीने मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., मे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. व मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. या संबंधित तेल कंपन्यांस बंधपत्र घेऊन देण्यात यावा.

४) कॅप्सुल टॅंकर क्रमांक एमएच-०६-अेक्यु-५४०२ व एमएच-०४-ईएल-८७३३ या दोन्ही टॅंकरमधुन कमी मिळालेल्या एकुण २२२.२९ कि.ग्रॅ. एलपीजी गॅसच्या साठयाची किंमत संबंधित तेल कंपनीने ठरवून दिलेल्या प्रचलीत दरानुसार दोन्ही टॅंकरच्या मालकांकडून समसमान रुपाने विभागून वसुल करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

५) जप्त करण्यात आलेले ट्रक क्रमांक एमएच-०४-एफजे-२०८८, ट्रक क्रमांक एमएच-४३-यु-४५५६, कॅप्सुल टॅंकर क्रमांक एमएच-०६-अेक्यु-५४०२ व कॅप्सुल टॅंकर क्रमांक एमएच-०४-ईएल-८७३३ ही चारही वाहने शासनजमा करण्यात येत आहे. सदर वाहनांची बाजारमुल्या एवढी प्रत्येकी रक्कम भरण्यास वाहनांचे मालक तयार असल्यास, तेवढी प्रत्येकी रक्कम भरल्यानंतर सदरची वाहने त्यांच्या मालकास परत करण्यात यावीत व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी वाहनांच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

६) अथवा वाहनांचे मालक सदरची प्रत्येकी रक्कम भरण्यास तयार नसल्यास या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरची वाहने लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/—
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम या कंपनीचे संचालक
२) मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम या कंपनीमध्ये अॅडमिनिट्रेशन मॅनेजर, भरत ठक्कर

३) मे. कॉन्फीडन्स पेट्रोलियम या कंपनीमध्ये प्लांट ऑफिसर, धनेश शरद संपत

४) टँकर क्र. एमएच ०६ अेक्यू ५४०२ चे मालक

५) टँकर क्र. एमएच ०६ अेक्यू ५४०२ चे चालक संजयकुमार श्रीगंगाप्रसाद यादव

६) टँकर क्र. एमएच ०६ अेक्यू ५४०२ चे क्लिनर

७) टँकर क्र. एमएच ०४ इएल ८७३३ चे मालक

८) टँकर क्र. एमएच ०४ इएल ८७३३ चे चालक भानूप्रताप मौर्या

९) टँकर क्र. एमएच ०४ इएल ८७३३ चे क्लिनर

१०) ट्रक क्रमांक एमएच ०४ एफ जे २०८८ चे मालक

११) ट्रक क्रमांक एमएच ०४ एफ जे २०८८ चे चालक

१२) ट्रक क्रमांक एमएच ०४ एफ जे २०८८ चे क्लिनर

१३) ट्रक क्रमांक एमएच ४३ यू ४५५६ चे मालक

१४) ट्रक क्रमांक एमएच ४३ यू ४५५६ चे चालक

१५) ट्रक क्रमांक एमएच ४३ यू ४५५६ चे क्लिनर

(वरिष्ठ पोलिस निरिक्षक, आर.सी.एफ. पोलीस ठाणे, चेंबूर यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, आर.सी.एफ. पोलीस ठाणे, चेंबूर यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १० पी डिमेलो रोड, वाडी बंदर, मुंबई-४०० ०१० (दुरध्वनी क्र. ०२२-३७५८१३०) यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

३) विभागीय व्यवस्थापक, मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

४) विभागीय व्यवस्थापक, मे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

५) चिफ टर्मिनल मॅनेजर, मे. बी.पी.सी.एल. रिफायनरी, माहुल, मुंबई.

६) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

७) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.

८) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.